आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, १८ मार्च २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी • दैनिक

वर्ष - ०२ • अंक -१९९

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • SATURDAY 18 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-02 • ISSUE-199 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5



राजस्थानी मल्टीस्टेट

कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ

बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स

मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,

टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी

संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING

Powered by Tatkal Banking

आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे... राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४९८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

तात्काळ बँकिंग सुविधा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा

* नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा


# सरकारची कबुली : पत्रकार वारिसेंचा जाणीवपूर्वक अपघात



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील 'महानगरी टाईम्स' या वृत्तपत्राचे पत्रकार शशिकांत वारिसे यांचा जाणीवपूर्वक नाणार परिसरात वाहन अपघात घडवून आणला, अशी कबुली राज्य सरकारने दिली आहे. विधान परिषदेत विरोधकांनी विचारलेल्या लेखी प्रश्नाला सरकारच्या वतीने देण्यात आलेल्या लेखी उत्तर ही कबुली देण्यात आली. या प्रकरणाची एसआयटी चौकशी सुरु असल्याची माहितीही सरकारने या लेखी उत्तरात दिली.**

पत्रकार शशिकांत वारिसे यांचा अपघाती मृत्यू झाला होता. राजापूर येथील पेट्रोल पंपावर त्यांना थार गाडीने जोरात धडक दिली होती. त्यानंतर त्यांना उपचारासाठी रत्नागिरीहून कोल्हापूर येथे दाखल करण्यात आले होते. यावेळी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. शशिकांत वारिसे यांचा हा अपघात नसून घातपात असल्याचा आरोप रिफायनरीविरोधी संघटनेने केला होता. रत्नागिरीतील पत्रकार शशिकांत वारिसे यांच्या मृत्यू प्रकरणात कार चालक पंढरीनाथ आंबेरकर याला अटक करून हत्या केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

शशिकांत वारिसे यांच्या हत्याप्रकरणी अटक करण्यात आलेला आरोपी पंढरीनाथ आंबेरकर हा राजापूर तालुक्यातील कुंभवडे या गावचा रहिवासी आहे. सुरुवातीच्या काळात छोटासा आंबा व्यापारी असलेला पंढरीनाथ आंबेरकर 2017 सालानंतर मात्र आर्थिकदृष्टीने सक्षम झाला. कोकणात नाणार रिफायनरी प्रकल्पाची घोषणा झाली आणि त्यानंतर त्याने काही जमीन खरेदी विक्रीचे व्यवहार सुरु केले. स्वतः देखील काही जमिनी खरेदी केल्या. यामध्ये त्याला आर्थिक नफा चांगलाच झाला. दरम्यानच्या काळात त्याने टूर्स अँड ट्रॅव्हल्स व्यवसाय सुरु केला आणि वाढवला.

पत्रकार शशिकांत वारिसे यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाची चौकशी एसआयटीमार्फत होणार असल्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदेश दिले होते. वारिसे यांच्या मृत्यूची चौकशी एसआयटीमार्फत करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. त्याप्रमाणे मृत्यूच्या पाच दिवसानंतर म्हणजे 11 फेब्रुवारी 2023 ला देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले होते. राज्यातील पत्रकार संघटनांनी आरोपींना तत्काळ कठोर शिक्षा करण्याची मागणी केली आहे.

# दुधात भेसळ करणाऱ्यांना फाशीची तरतूद करा

## अजित पवार : दूध भेसळीचा प्रश्न गंभीर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात दूध भेसळीची समस्या अत्यंत गंभीर झाली आहे. दूध भेसळीचे मोठे सामाज्र पसरले आहे. दूध भेसळीचा प्रश्न गंभीर असून लहानग्या कच्च्या-बच्च्यांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार सुरु आहे. दूध भेसळ करुन सामान्य जनतेच्या जिवाशी खेळ करणाऱ्यांना फाशी देण्याची तरतूद करण्याची मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली. दरम्यान दुधाच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी अतिरिक्त दूध उत्पादनाच्या काळात सहकारी संस्थांना पावडर करुन एक्सपोर्ट करण्याची परवानगी देण्याची मागणीही अजित पवार यांनी केली.



राज्यात दूधाच्या उत्पादनात दिवसेंदिवस वाढ होत आहे. येत्या काही काळात राज्यात एक कोटी लीटरपर्यंत दूधाचे कलेक्शन जाण्याची शक्यता आहे. मात्र दूध व्यवसायात काही अपप्रवृत्तींचा शिरकाव झाला आहे. दूध भेसळ करणाऱ्यांचे मोठे सामाज्र पसरले आहे. राज्यात दूध भेसळीची समस्या अत्यंत गंभीर बनली आहे. दूध भेसळ करुन लहानग्यांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार सुरु आहे. दूध भेसळीमुळे सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळण्याचा प्रकार सुरु आहे. आघाडी सरकारच्या काळात दूध भेसळ करताना सापडल्यास त्याला फाशीची शिक्षा करण्याची तरतूद करण्याचा कायदा प्रस्तावित होता. मात्र राष्ट्रपती महोदयांनी या कायद्याला परवानगी दिली नाही, त्यामुळे हा कायदा झाला नाही. मात्र दूध भेसळ ही अत्यंत गंभीर समस्या असून दूध भेसळ करणाऱ्याला फाशीची तरतूद करण्याची मागणी अजित पवार यांनी सभागृहात केली.

# दिवाळीपूर्वीच मराठवाडा रेल्वे कोच कारखान्याचा शुभारंभ : रेल्वेमंत्री

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** मराठवाडा रेल्वे कोच कारखान्याचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिवाळीपूर्वी होणार असल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. तर लातूर रेल्वे स्टेशनवर पिट लाईन उभारण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. लवकरच पिट लाईन उभारण्याच्या कामाला सुरुवात होणार असल्याचे वैष्णव म्हणाले.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची खा. सुधाकर शृंगारे यांनी दिल्ली येथे नुकतीच भेट घेतली. या भेटीदरम्यान लातूरला पिट लाईनला मंजुरी देण्यात येत असल्याचे रेल्वेमंत्र्यांनी सांगितले. नवीन रेल्वे गाड्या सुरुवात करण्यासाठी अडचण येत असल्यानं लातूर रेल्वे स्टेशनवर पिट लाईन उभारावी अशी मागणी मागील अनेक वर्षापासूनची आहे. याबाबत खासदार सुधाकर शृंगारे यांनी अनेकदा रेल्वे विभागाकडे पाठपुरावा केला होता. त्याला आता यश आले आहे. मराठवाडा रेल्वे कोच कारखाना आणि पिट लाईन संदर्भात खासदार सुधाकर शृंगारे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. या भेटीत खासदार सुधाकर शृंगारे यांनी मराठवाडा रेल्वे कोच कारखान्या संदर्भातील संपूर्ण माहिती अश्विनी वैष्णव यांना दिली. मराठवाडा रेल्वे कोच कारखान्याचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थित दिवाळीपूर्वी करण्यात येणार आहे, याबाबत रेल्वेमंत्र्यांनी आश्वस्त केल्याचे शृंगारे म्हणाले. तसेच लातूर रेल्वे स्टेशनवर पिट लाईन उभारणीच्या मागणीला या भेटीदरम्यान अश्विनी वैष्णव यांनी मंजुरी दिली. पिट लाईनला मंजुरी देण्यात आल्याने लातूर स्टेशनवरुन नवीन गाड्या सुरुवात करण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे. पिट लाईनची सुविधा उपलब्ध झाल्यास रेल्वे गाड्यांची स्वछता, कोचची, पाणी उपलब्ध करणे, किरकोळ दुरुस्ती अशा अनेक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

# गंगाखेड तालुक्यातील उखळी शिवारात वीज पडून २ जागीच ठार; तर ३ जखमी

## परभणी जिल्ह्यात सर्वत्र अवकाळी पावसाचा हाहाकार

आधुनिक केसरी न्यूज

परभणी : जिल्ह्यात सर्वत्र विजेच्या कडकडाटासह कोसळणाऱ्या अवकाळी पावसासह गारपीटीने हाहाकार माजवला असुन जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातल्या उखळी खुर्द परीसरात झालेल्या अवकाळी पावसात विज पडून बालासाहेब बाबुराव फड वय वर्षे ५० व जयवंत नागरगोजे वय वर्षे ३५ हे दोघे जण जागीच ठार झाल्याची तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना घडली आसून घटनास्थळी पोलिस पथकाना तात्काळ धाव घेतली परंतु तहसिलदार/नायब तहसिलदार व महसुल प्रशासनातील अधिकारी/कर्मचारी फिरकलेच नाही. गंगाखेड तालुक्यात गुरूवार मध्यराञी पासूनच विजेच्या गडगडाटासह पावसाची सुरूवात झाली. शुक्रवार दुपारच्या सुमारास विजेचा गडगडाट सुरू झाला यातच पावसाला सुरूवात झाली. तालुक्यातील उखळी खुर्द परिसरात विजेचा गडगडाट व पाऊस आल्याने शेतकरी बालासाहेब फड व सालगडी हे शेतातील बाबळीखाली थांबले आसता वीज पडल्याने या दोघांचा जागेवरच मृत्यू झाला तर झाडाचे दोन तुकडे झाले. तर जवळ थांबलेल्या राहिबाई बाबुराव फड,




शुक्रवार रोजी औरंगाबाद जिल्ह्यात एकूण 1 .8 मिमी इतका पाऊस झाला असून 01 गाय वीज पडून मरण पावली आहे .

राजेभाऊ किसन नरवाडे, सतीश सखाराम नरवाडे वय हे तिघे जण भाजले गेले. त्यांना तातडीने गंगाखेड उपजिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यात राहिबाई फडवर उपचार करून परभणी येथे हालविण्यात आले आहे. उखळी खुर्द येथे वीज पडल्याची घटना कळताच पो.नि. वसुधंरा बोरगावकर यांनी धाव घेत पंचनामा केला पण तहसीलदार नायब तहसीलदार फिरकलेच नाही.

मराठवाड्यासह परभणी जिल्ह्यात निसर्गाची अवकृपा झाल्याचे निदर्शनास येत असून या आसमानी संकटात पुर्णा तालुक्यातील अन्नदाता शेतकऱ्यांना देखील आपल्या कचाट्यात घेतल्याचे दिसत आज शुक्रवार दि .१७ मार्च २०२३ रोजी तालुक्यात सर्वत्र अवकाळी पावसासह काही भागात गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांसह काढणीला आलेल्या पिकांचे देखील नुकसान झाल्याने निसर्गाने शेतकऱ्यांच्या हाता तोंडाचा घास निसर्गाने पळवल्याने शेतकरी हवालदील झाला आहे . पुर्णा तालुक्यात कालपासून सर्वत्र वातावरणातील अचानक झालेल्या बदला नंतर आज शुक्रवारी ०४-०० वाजेच्या सुमारास तालुक्यातील आवई शिवारात जोरदार गारपीट झाली .या गारपिटीने शेती पिकांसह आंबा, संत्रा, मोसंबी फळबागांचे देखील



मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे .मागील दोन दिवसांपासून तालुक्यात ढगाळ वातावरण होते काल गुरुवार दि .१६ मार्च २०२३ रोजी काही भागात विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला तर आज शुक्रवारी सकाळ पासूनच थंड वातावरण होते .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

आरोप होतात. संमेलनाला गालबोट लागते. तुला म्हणून सांगते. जेव्हा व्यासपीठावर कार्यक्रम सुरु होते ना, तेव्हा मी व्यासपीठावर नव्हतेच ! तुमच्यामध्ये पण बसलेले नव्हते. मी उभी होते एका कोपऱ्यात. आणि कोपऱ्यात उभ्या असलेल्या व्यक्तीकडे कोणाचं लक्ष जातं ? उत्सव माझा, माझ्या नावानं सगळं पण उपेक्षित मीच ! तू जे मघाशी विचारलंस ना की हा भरजरी शालू कशानं फाटला, त्याचं कारण आता तुझ्या लक्षात आलं असेल. नाही म्हणायला मला एका गोष्टीचा आनंद झाला. मराठी वाचकांचा टक्का वाढल्यासारखा मला दिसतो. कारण ग्रंथविक्री विक्रमी झाली...' ' अनेक नवोदित कवी, लेखक नवनवीन साहित्य लिहून मोलाची भर घालताहेत. तरीही मला वाटतं की अजून उत्तमोत्तम, कसदार साहित्य निर्माण व्हावं. त्या साहित्याच्या वाचनाने नवीन पिढ्या समृद्ध व्हाव्यात. हे साहित्य संस्कार देणारं असावं, जगणं शिकवणारं असावं. सामान्य माणसांच्या आयुष्याशी निगडित गोष्टींची चर्चा साहित्यात व्हावी. त्याला त्यापासून मार्गदर्शन मिळावं. सामान्य रसिक वाचक केंद्रस्थानी ठेवून लेखक, कवींनी लिहितं व्हावं. मराठी मातीत जन्मलेले अनेक सुपुत्र अनेक उच्च पदांवर काम करत आहेत. कोणी शास्त्रज्ञ, कोणी प्राध्यापक इ. पण यातली बरीचशी मंडळी इंग्रजीत लेखन करण्यात धन्यता मानतात. त्यांनी आपले विचार सर्वसामान्यांसाठी मराठीत मांडावे...' ' शासनाकडून मला फार अपेक्षा नाहीत. माझ्या अपेक्षा तुमच्यासारख्या माझ्या सुपुत्रांकडून आहेत. वाचक, लेखक, कवी यांनी मला समृद्ध करावे ही माझी अपेक्षा. साहित्य संमेलने व्हावीत ती तुम्हा सगळ्या रसिक वाचक, लेखकांच्या बळावर असे मला वाटते. त्यात उत्स्फूर्तता हवी, बळजबरीचा रामराम नको... ! बाळा, माझ्या मनातलं सांगितलं तुला. खूप काही बोलण्यासारखं आहे. पण सगळं सांगण्यातही अर्थ नसतो.



## आनंदी पहाट

## अर्थार्जनाचे मार्ग खुले करणारे शिक्षण घ्यावे

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यात येणारा प्रत्येक क्षण जे काही शिकवतो तेच खरं शिक्षण. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया असून जीवनाच्या प्रारंभापासून अगदी अंतापर्यंत प्रत्येक व्यक्ती काही-ना-काही शिकतच असते. शिकवण कधी मिळाली ? त्याच बरोबर ती कशी, कोठे, कोणाकडून मिळाली ? हेही तितकंच महत्वाचं असतं. शिक्षणातून व्यक्तिमत्व विकास घडतो आणि आत्मविश्वास वाढीस लागतो. आपल्या मुलभूत गरजा भागवण्यासाठी अर्थार्जन अनिवार्य झालं आहे. त्या अनुषंगानं करिअर महत्वाचं ठरत आहे. दहावी आणि बारावीच्या शैक्षणिक पात्रतेवर करिअरचे अनेकविध पर्याय उपलब्ध असतात. एकूणच मिळालेल्या गुणांवर पुढील मार्ग निवडावे लागतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आवड आणि निवड यांचा करिअरच्या दृष्टीकोनातून खूपच जवळचा संबंध असतो. तरीही केवळ आवड आहे म्हणून करिअरची निवड करणं उपयोगी ठरतंच असं नाही. अनेकदा आवडतं करिअर निवडलं तरीही केवळ ते आपल्या मुलभूत गरजा भागवण्यासाठी उपयुक्त ठरतंय का ? हेही बघणं जरुरीचं असतं. सद्यःस्थितीत जे शिक्षण त्वरीत अर्थार्जनाचे मार्ग खूले करेल तेच निवडलं पाहिजे. मग ते अगदी परदेशात जाऊन घ्यावे लागले तरी काय हरकत आहे ? तो कदाचित आपल्या विकासाचा पाया ठरू शकतो. अर्थातच त्यासाठी भरगोस यश मिळालंच पाहिजे. निरनिराळ्या देश-विदेशांतील या अशाच अनेक यशोगाथा तसंच तेथील शिक्षणाविषयीची सविस्तर माहिती अनेकप्रकारे उपलब्ध होत असते. पण नेमकं कोणतं करिअर निवडावं ? याचाच संभ्रम निर्माण होत असतो. परदेशातील करिअरची ओढ अनेकांना असते, परंतू अनेकदा संबंधीत पुरेशी माहिती एकत्रीतपणे मिळत नाही. आपल्याला दीर्घ आणि निरोगी आयुष्य मिळवण्यासाठी योग्य करिअरची निवड करणं अनिवार्य असतं. केवळ योग्य करिअर आपल्याला पुरेसं अर्थार्जन मिळवून देऊ शकतं.



आधुनिक केसरी

**जाणी अंतरंग | गोविंदा तू ||**
**काळजाचा नाद | एक हरिनाम ||**
**व्हावे निजधाम | गोविंदाचे ||१||**
**काया वाचा मन | करूनी त्रिशुध्दी ||**
**स्थिर होय बुध्दी | सर्वकाळ ||२||**
**ऐशा काळजात | नांदतो श्रीरंग ||**
**अर्जुनाचा संग | धाम त्याचे ||३|**
**टाळ-मृदुंगाचा | अनाहत नाद ||**
**घाली मज साद | निरंतर ||४||**
**आलो तुझ्या दारी | होऊनी निस्संग ||**
**जाणी अंतरंग | गोविंदा तू ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


**मार्जकेण भवेत् स्वच्छं**
**शुद्धं तु क्रीयतेऽग्निना।**
**पवित्रं प्रोक्षणात् भवेत्**
**मनः स्वर्णं गृहं तथा॥2॥**

**घर झाडूने, मन दुर्विचार मिटवून व सोने ब्रशने स्वच्छ होते. मन ज्ञानाच्या अग्नीने, सोने तापवून भेसळ दूर करून व घर दिवा लावून शुद्ध केले जाते. मन सुविचारांचे, घर सडासंमार्जनाचे; व सोने रिठ्याचे/ कावेचे पाणी शिंपडून पवित्र होते.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**अंजुलि जल क्षण क्षण घटै, नश्वर तनु सो जाय । तिमि आयू पल-पल घटै, फेन ऊठ गलि जाय ।।१८६।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/१८६**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
ज्याप्रमाणे ओंजळीतील पाणी थेंबाथेंबाने खाली गळून पडून संपून जात आहे त्याप्रमाणेच हे शरीर विनाशशील आहे. शरीराचं आयुष्य प्रतीक्षण कमी कमी होत आहे आणि एक दिवस हे आयुष्य संपून मृत्यू होणार आहे. ज्याप्रमाणे पाण्यावर आलेला फेस काही काळ त्यावर राहून पुन्हा पाण्यात विलीन होणार आहे, तद्वतच जीवांचं शरीर क्रमशः जन्म, स्थिती आणि मृत्यू प्राप्त करीत आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## ग्रंथ कसा असावा

आधुनिक केसरी

त्याच्या परिशीलनाने माणसाला विरक्ति प्राप्त होते. मुख्य म्हणजे त्याचे दोष सुधारतात.त्याची अधोगती टळते तोच खरा ग्रंथ होय. त्याचा अभ्यास केला असता माणसाच्या अंगी धैर्य निर्माण होते. त्याला परोपकार करायची सद्बुद्धी निर्माण होते. जीवनातील भौतिक गोष्टींना तो विषेश महत्व देत बसत नाही. जो ग्रंथ वाचला तर माणसाला परमार्थ साधना समजते. त्याच्या नित्य सहवासाने साधकाला आत्मज्ञान प्राप्त होते.अशा वाचनाने त्याचे जीवन सफल संपूर्ण झाल्या सारखे वाटते. तोच खऱ्या अर्थाने ग्रंथ होय. मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ काय ? समर्थाच्या मते मानवी जीवनातील सर्व श्रेष्ठ मूल्य कोणते आणि ते साधण्यासाठी किंवा अनुभवण्याचा मार्ग कोणता या दोन गोष्टी पद्धतशीर पणें सांगणे हे खरे वाःड्मयाचे खरे कार्य आहे. असे समर्थाचे मत आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

**न वजती पाप । तीर्था म्हणे वेचूं काय ॥२॥**
**तुका म्हणे मनीं नाहीं । न ये आकारातें कांहीं ॥३॥**
**वळितें जें गाई । त्यासि फार लागे काई ॥१॥**
**निवे भावाच्या उत्तरीं । भलते एके धणी वरी ॥ध्रु.॥**
**न लगती प्रकार । कांहीं मानाचा आदर ॥२॥**
**सांडी थोरपणा । तुका म्हणे सवें दीना ॥३॥**
**मैत्र केले महा बळी । कामा न येती अंतकाळीं ॥१॥**
**आधीं घे रे रामनाम । सामा भरीं हा उत्तम ॥ध्रु.॥**
**नाहीं तरी यम । दांत खातो करकरा ॥२॥**

## मला जनप्रियत्व फार आवडते

आधुनिक केसरी

इथून जाणाऱ्या मंडळींना निरोप देताना मला खरोखरच फार वाईट वाटते. पुन्हा आपली भेट होईल की नाही ते काही सांगता येत नाही. तुम्ही सर्वांनी एकमेकांशी अत्यंत प्रेमाने वागा. प्रेमाने जग जिंकता येते. तुम्ही माझ्यापासून जनप्रियत्व शिका. मला जनप्रियत्व फार आवडते. कारण जो लोकांना आवडतो, तोच भगवंताला आवडतो. जो निःस्वार्थी असेल त्यालाच जनप्रियत्व येईल. जो भगवंताच्या इच्छेने वागेल त्यालाच जनप्रियत्व येईल. आपण आपल्यासाठी जे करतो ते सगळ्यांसाठी करणे, हे भगवंताला आवडते. आपण आपल्यापुरते न पाहता सर्व ठिकाणी भगवंत आहे असे पहावे. प्रत्येकाला आपण हवेसे वाटले पाहिजे. असे वाटण्यासाठी लोकांच्या मनासारखेच वागले पाहिजे किंवा त्यांना आवडेल तेच बोलले पाहिजे असे नाही. प्रेम करायला कशाचीही जरूरी लागत नाही; पैसा तर बिलकूल लागत नाही, हे मी माझ्या अनुभवावरून सांगतो. जगात कुणी कधी भोगली नसेल एवढी गरिबी मी भोगली आहे.



अशा गरिबीमध्ये राहूनही माझे अनुसंधान टिकले, मग तुम्हाला ते टिकवायला काय हरकत असावी ? मी जर काही केले असेल तर मी कधीही कुणाचे अंतःकरण दुखवले नाही. तेवढे तुम्ही सांभाळा. जो जो कोणी मला भेटला, तो तो मी आपलाच मानला. मी नुसता खेळ मांडला आणि तो खेळलो; त्यामुळे त्याचे सुखदुःख मला कधी बाधले नाही. नाम घ्यायची इच्छा पूर्ण झाली नाही म्हणून मी पुन्हा जन्मास आलो. मला तुम्ही सगळे रामरूप दिसत आहात. मला जे सांगायचे असेल ते मारुतीरायाला सांगावे म्हणजे ते मला कळते. माझा मनुष्य कुठेही असला तरी तो माझ्याकडेच येणार. मला दुश्चित्तपणा अगदी आवडत नाही. ज्यांनी माझी निंदा केली त्यांना तर मी कोण हे कळले नाहीच; पण ज्यांनी माझी स्तुती केली त्यांना मी कोण आहे हे त्याहून कळले नाही. प्रत्येकाला वाटते की आपल्याला लोकांनी चांगले म्हणावे, मी मात्र वागायचा तसाच वागेन; हे कसे शक्य आहे ? नाम घेतल्याने आपले सर्व अवगुण आपल्यालाच कळून येतील याबद्दल खात्री बाळगा आणि अंतःकरणपूर्वक नाम घ्या. एक भगवंताचे नाम घट्ट धरावे, त्यामधे अती उत्कटता ठेवून एकतानता करावी आणि स्वतःला पूर्ण विसरून जावे. 'मी नाम घेतो' हे देखील विसरून जावे. हाच खरा परमार्थ होय. नामामधे एकतानता होण्यासाठी भगवंताच्या साक्षित्वाने वागा; हवे-नकोपण टाकून द्या; राम कर्ता ही भावना ठेवा; विषय मालकीने भोगा; आपला गुण भगवंताकडे लावा; लहान मूल होऊन देवाकडे जा; रामाला आपले सुखदुःख सांगा; देहभोगाला कंटाळू नका; काळजी 'घ्या' पण काळजी 'करू' नका आणि निर्भय बना आणि अशा रीतीने जिवंतपणी आपले मरण पहा.


**आजचे बोधवचन आहे - जिथे नाम आहे तिथे मी आहे म्हणून खचित समजा.**

# कर्मचाऱ्यांचा पेन्शन हक्क आहे; हट्ट नव्हे..!

आधुनिक केसरी


**राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या वतीने 14 मार्चपासून महाराष्ट्रात बेमुदत संप सुरू आहे. नोव्हेंबर 2005 नंतर राज्य सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन दिली जाणार नाही.याच कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर महाराष्ट्रात सरकारी कामकाज सर्वत्र ठप्प पडले आहे. सरकार या प्रश्नी तोडगा काढण्याचे प्रयत्न करताना दिसून येत नाही. याच प्रश्नांवर महाराष्ट्रातील आधुनिक केसरीच्या वाचकांनी पेन्शन कर्मचारी वर्गाचा घटनेने दिलेला हक्क आहे, हट्ट नव्हे अशा संवेदनशील प्रतिक्रिया आधुनिक केसरी चर्चेत दिल्या. त्या वाचकांसाठी खास प्रसिद्ध करीत आहोत..**

## कर्मचाऱ्यांचा हेतू समजून घ्या



सरकारी नोकरी मिळवणं आणि ती टिकवणं हे खूपच जिकरीचं काम आहे . सरकारी नोकरी मिळवताना रक्ताचं पाणी करायला लागतं बुद्धी घासून घासून त्याचा कस लावावा लागतो. त्याहून कठीण म्हणजे नोकरी मिळाल्यानंतर ती टिकवण. तुटलेल्या जुन्या इमारती, कधी डोक्यावर छप्पर पडेल याची शाश्वती नाही, ग्रामीण भागात पंखे आहेत पण वीज नाही, दर तीन वर्षांनी बदलीची टांगती तलवार, स्त्रियांचे तर त्याच्याहूनच वाईट हाल, जिथे बदली मिळेल तिथे रुजू व्हावं लागतं, मातृत्व बाजूला ठेवून शासनाशी इमान राखावा लागतो. तुमची क्षमता तुमचं शिक्षण याला इथे वाव नसतो. बदलणारा पॅकेज नसतं, फक्त ठरलेलं पदोन्नतीच गाजर असतं. तुम्ही स्वतःला किती सिद्ध करा. शासनाच्या गणती तुमच अस्तित्व फक्त एक शासकीय नोकर. तुम्हाला आमची सुट्टी दिसते, पण खरंच आम्ही ती घेऊ शकतो का ? आता अत्यावश्यक सेवेच्या नावाखाली तीही नाकारली जाते.आम्हा प्रत्येक परिचारिकेला किती वेळा कोविडचे इन्फेक्शन होऊन गेलं असेल हे आम्हालाच माहिती. तरीदेखील आमचा व आमच्या कुटुंबीयांचा जीव मुठीत घेऊन आम्ही कार्यरत होतो. कार्यतत्पर होतो व राहू. कुणाला आवडत संपावर जायला! रुग्णांचे जीव धोक्यात घालायला!! मुळीच नाही. पण हे जे जुनी पेन्शन योजना आहे तीच सरकारी कर्मचाऱ्यांची म्हातारपणाची लाठी आहे. आयुष्यभर इमाने ईदबारे केलेल्या साधनेच हे फलित आहे. तेच तुम्ही काढून घेतली तर बिचारा कोलमडेल हो. तमाम जनतेला एकच आवाहन आहे. सरकार नोकर भरती करत नाही त्याचा राग तुम्ही आमच्यावर काढू नका. सरकारी असो अथवा खाजगी प्रत्येक फील्डमध्ये काही स्वार्थी लोक असतातच मग सगळ्यांनाच त्यात गृहीत धरू नका. इमानदारीने काम करणारा पण सरकारी कर्मचारी वर्ग आहे हे लक्षात ठेवा आणि त्यांच्यामुळेच हे प्रशासन कार्यरत आहे, त्यांना सहकार्य करा मित्रांनो. आज नाही तर कधी नाही. पुढील येणारी पिढी ही फक्त पेन्शन हा शब्द गोष्टीतूनच ऐकेल. त्यांना पण त्याचा आनंद घेऊ द्या. आम्हाला पेन्शन आहे त्यामुळे आमचा वृद्धापकाळ किती स्वावलंबनाने जगता येईल तसंच त्यांना पण जगू द्या मित्रांनो. हे एकच आवाहन आज नसतील तर उद्या तुमची ही मुलं बाळ या सरकारी नोकरीत येऊ शकतात. त्यांना या पेन्शन पासून वंचित ठेवू नका. **- डॉ. दीपाली उमाळे, संपर्क-9969739833**

## योग्य न्याय मिळावा



बेमुदत संपावर गेलेल्या राज्य सरकारी कर्मचारी यांच्या मागण्यांबाबत शासनाने निश्चितपणे सकारात्मक दृष्टिकोन समोर ठेऊन तोडगा काढणे याप्रसंगी गरजेचे आहे. NPS/ DCPS हे शब्दच्छल करून नाहक दृढमूढ करत बसण्यापेक्षा योग्य व समर्पक न्याय्य वाटप होणे सध्यस्थितीला अनुरूप होईल.तसेच, सरकारी कर्मचारी यांनी सुध्दा जुनी निवृत्तीवेतन सह इतर सुध्दा आपल्या मागण्या आहेत यावर प्रकाशझोत टाकावा एक कलमी मागणीचा रेटा समाजासमोर आणून नकारात्मक भावना वाढीस लावता कामा नये.आपल्याच जनतेसाठी जनसेवा करणाऱ्या जनसेवक कर्मचाऱ्यांना समाजसृढ बनविण्याचे आपण द्योतक आहात हे बुद्धिजीवी वर्गानी विसरून चालणार नाही. प्रणाली आणि योजना एकाच निवृत्तीवेतनाच्या दोन रूपे जरी असले तरी एकातून समाजस्वास्थ्य कुठेतरी लोप पावतोय.ते स्वास्थ टिकवून ठेवणे हे शासनकर्ते यांच्या इच्छाशक्तीवर अवलंबून आहे. तर सेवा हमीच्या जबाबदारीतून आपण अलिप्त न राहता समाजमन जपणे हे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहे.

**- वसंत राठोड, संपर्क-8169133561**

## कर्मचाऱ्यांवर ओरड कशाला ?



राज्य सरकारी कर्मचारी संपावर गेले आहेत. नवीन पेन्शन योजनेतली अनिश्चितता कर्मचाऱ्यांना संपावर जाण्यास कारणीभूत आहे. नवीन पेन्शन योजनेतील पैसा शेअर मार्केटमध्ये गुंतवून त्यावर मिळणाऱ्या लाभांश यावर कर्मचाऱ्यांची पेन्शन अवलंबून आहे. मागील काही महिन्यात नवीन पेन्शन योजना लाभांश पाहला तर तो ऋण स्वरूपाचा आहे. जेव्हा हे लोकशाहीचे सरकार आहे तर ज्याप्रमाणे लोकप्रतिनिधी स्वतःची पेन्शन बंद करत नाही तर मग आमची करायला नको. जर का नवीन पेन्शन योजना चांगली असेल तर 2005 नंतर नियुक्त होणाऱ्या लोकप्रतिनिधींनी ही नवीन पेन्शन योजनेचा स्वीकार करायला हवा. पेन्शन देणे सरकारचा नैतिक अधिकार आहे. नवीन पेन्शन योजना कर्मचाऱ्यांसाठी हितकारक आहे तर मग त्या लोकप्रतिनिधींनी सुद्धा नवीन पेन्शन योजना स्विकारायला पाहिजे, ते का बरं जुनी पेन्शन योजना स्वीकारतात. हि दुटप्पी भावना कर्मचाऱ्यांना संप करण्यास कारणीभूत आहे. सेवानिवृत्तीनंतर मानाचे व स्वाभिमानाचे जीवन जगण्यासाठी म्हातारपणी जुनी पेन्शन योजना सोयीस्कर व श्रेष्ठ आहे. त्यासाठी हक्कासाठी लढणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांवर आरडाओरड कशाला केली पाहिजे ?

**-रविंद्र फटिंग, संपर्क- 8055273031**

## पेन्शन हक्क आहे, हट्ट नव्हे



राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप न्याय आणि हक्क मिळण्यासाठी आहे. पेन्शन घटनेने कर्मचाऱ्यांना दिलेला हक्क आहे. ती सरकारची नैतिक जबाबदारी आहे. परंतू या संवेदनशील प्रश्नांची सरकारला जाणीव नसणे लोकशाहीच्या वर्तनाला शोभणारे नाही. लोकशाहीत प्रत्येकाला हक्कासाठी लढ्याचा हक्क आहे. शासकीय कर्मचारी शासनाचा पाठीचा कणा आहे. त्या पाठीचा कण्याला वा-यावर सोडून त्यांच्या प्रश्नांना भिजत ठेवायचे हे वास्तव म्हणजे एकप्रकारे दिशाभूलच म्हणावी लागेल. म्हणून सरकारने न ताणता या प्रश्नी तात्काळ तोडगा काढणे गरजेचे आहे. पेन्शन देणे सरकारचा नैतिक अधिकार आहे. नैतिक अधिकार डावलून या संपाकडे गांभीर्यपूर्वक न बघणे सरकारसाठी धोक्याची घंटा म्हणावी लागेल. म्हणून पेन्शन हा हक्क आहे, हट्ट नव्हे हे लक्षात घेणे गरजेचे आहे. **- दत्ताबापू काळुंके, संपर्क- 9702240301**

## पेन्शनचा हक्क मिळालाच पाहिजे..



महाराष्ट्रात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा पेन्शनच्या हक्कासाठी संप सुरू आहे तो योग्यच आहे. कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर शासनाने दखल न घेतल्याने सरकारी कामे ठप्प पडली आहेत. या निमित्ताने शासनच एक वेगळा संदेश लोकांपर्यंत पोहोचवत आहे. मुळात कर्मचाऱ्याच्या प्रश्नांवर कर्मचाऱ्यांना भांडलयाशिवाय काहीच मिळत नाही हा इतिहास आहे. पेन्शन देणे सरकारचा नैतिक अधिकार आहे. ज्या राज्यकर्त्यांनी सरकारी कर्मचाऱ्यांची पेन्शन देणे नाकारले त्यांनी मात्र स्वतःचे वेतन व भत्ते यात प्रचंड वाढ करून घेतली हा विरोधाभास जनतेने लक्षात घेतला पाहिजे. कर्मचाऱ्याचा हक्काचा पैसा सुरक्षित नाही ही चिंता त्यांना सतावत आहे. म्हणून सरकारने कर्मचाऱ्यांना वेठीस न धरू नये, सरसकट पेन्शनचा हक्क मिळविल्याशिवाय कर्मचारी शांत बसणार नाहीत.

**- विठ्ठल काळे, संपर्क- 8888153728**



## भाजपच्या हालचाली

आधुनिक केसरी

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी लंडनमध्ये केलेल्या विधानांबाबत माफी मागितली नाही, तर त्यांचे लोकसभेतून निलंबन व्हावे, यासाठी भाजपने प्रयत्न सुरू केले आहेत. भाजपने यासंदर्भात विशेष चौकशी समितीची स्थापन करण्याची मागणी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे केली आहे. राहुल गांधी यांचे वक्तव्य हा केवळ हक्कभंगाचा मुद्दा उरलेला नसून हे प्रकरण त्यापेक्षा मोठे आहे, असे कायदामंत्री किरेन रिजिजू म्हणाले. त्यामुळे भाजप राहुल गांधींबाबत अधिक आक्रमक झाल्याचे स्पष्ट झाले आहे. हे प्रकरण आता अधिक गांभीर्याने घेतले जात असल्याचे एका नेत्याने सांगितले.
सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २००५मध्ये प्रश्न विचारण्यासाठी खासदारांनी पैसे घेण्याच्या प्रकरणी स्थापन झालेल्या चौकशी समितीच्या धर्तीवर ही समिती स्थापन करावी, अशी मागणी भाजपने लोकसभा अध्यक्षांकडे केली आहे. त्यावेळी काँग्रेस नेते पवनकुमार बन्सल यांच्या नेतृत्वाखालील समितीने आरोपींची चौकशी करून १० जणांची खासदारकी रद्द केली होती. रिजिजू म्हणाले की, देशासंबंधी एखादी गोष्ट ही सर्वांसाठी चिंतेची बाब असते. काँग्रेस किंवा त्यांच्या नेत्यांचे काय होते, याची आम्हाला फिकीर नाही. पण देशाचा अपमान झाला तर आम्ही गप्प बसणार नाही. भारतविरोधी शक्तींची भाषा अशीच असते. तीच भाषा राहुल गांधी यांनी वापरली आहे. भारताविरोधात काम करणाऱ्यांची ही भाषा आहे, असा आरोप रिजिजू यांनी केला. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी यापूर्वीच लोकसभा अध्यक्षांकडे राहुल गांधींविरोधात २२३ नियमांतर्गत हक्कभंगाची नोटीस दिली आहे. या नोटिशीमध्येच 'संसद आणि अन्य लोकशाही संस्थांचा मान राखण्यात अपयशी ठरल्याबद्दल राहुल गांधी यांची विशेष समितीमार्फत चौकशी करा' अशी मागणी दुबे यांनी केली आहे. अशा पद्धतीने विशेष चौकशी समिती स्थापन झाली, तर लोकसभेतील संख्याबळ गृहित धरता त्यात भाजपचे बहुमत असेल. साधारणत: चौकशी समितीकडून एका महिन्यात आपला अहवाल सादर केला जातो. बहुमताच्या आधारे राहुल गांधींवर ठपका ठेवून त्यांचे लोकसभेतून काही काळासाठी किंवा कायमस्वरुपी निलंबन केले जाऊ शकेल.

## संप कर्मचाऱ्यासाठी मेस्मा अस्त्र ठरणार काय ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**राज्यात सध्या सरकारी कर्मचाऱ्यांचा संप पेटला आहे. शासकीय व निमशासकीय कर्मच्यारी मोठ्या संख्येने बेमुदत संपाचं शस्त्र उगारल आहे. राज्यात जवळपास १७ लाख कर्मचाऱ्यांचा या संपाला पाठिंबा आहे. संपामुळे सरकारी दवाखाने आणि इतर सुविधा देखील कोलमडून पडल्या आहेत. इतरही सरकारी कामात अडथळा निर्माण होत आहे. सरकारने देखील एका बाजूला चर्चेची भूमिका घेतली आहे तर त्याचबरोबर संप वाढला तर संपाच्या विरोधात कारवाई करण्याची देखील तयारी केली आहे. त्याचंच एक पाऊल म्हणजे सरकराने मेस्मा कायदा सभागृहात मंजूर करण्यात आला आहे.**

खरं तर मेस्मा कायद्याची वैधता १ मार्च २०२३ रोजी संपली होती. त्यामुळे हा कायदा पुन्हा मंजूर करण्यात आला आहे.
याआधी एस टी कर्मचाऱ्यांच्या संपादरम्यानही मेस्मा कायद्याचं हत्यार उचलण्यात आलं होतं. त्यावेळी परिवहन मंत्री अनिल परब यांनी कर्मचाऱ्यांना थेट इशारा दिला होता कि, "एसटी महामंडळातील जे कर्मचारी कामावर हजर होत नाही येत. त्या कर्मचाऱ्यांवर मेस्माअंतर्गत कारवाई केली जाणार" त्यांनंतर तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने काही मेस्मा कर्मचाऱ्यांवर कारवाई देखील केली होती.मात्र एस टी कर्मचारी संपावर ठाम राहिले.या कायद्या अंतर्गत सरकारने एस टी कर्म चाऱ्यांवर कारवाई करून संप कर्त्यांमध्ये फूट पाडण्याचा डाव आखला होता.मात्र एस टी कर्मच्यारी सरकारच्या अस्त्राला बळी पडले नाही.आता परत एकदा सरकारने राज्य कर्म चाऱ्यांविरूद्ध मेस्माचं शस्त्र उगारले आहे.
एस टी कर्म च्यारी है मूठभर होतें.त्या तुलनेत सरकारी व निम सरकारी कर्मचारी लाखोच्या संख्येत आहे.है सर्व कर्म च्यारी आंदोलनात उतरले आहेते..स्वाभाविकच सरकारवर फार मोठा दबाव आल्याने संप करणाऱ्या संघटनांमध्ये फूट पाडण्याचा सरकारचा हेतू आहे.मात्र सरकारी कर्मच्यारी आपल्या आंदोलनावर ठाम आहेत.या पार्श्व भूमीवर सरकारनेअत्यंत घाईने मेस्मा कायदा मंजूर करून घेत संप करणाऱ्यांना इशारा दिला आहे.
राज्यात सध्या जुन्या पेन्शनसाठी १८ लाख कर्मचाऱ्यांचा संप सुरु आहे. अशातच मेस्मा म्हणजेच, अत्यावश्यक सेवा परीक्षण कायदा घाईघाईने मंजूर करण्यात आल्यामुळे आता जर हा कायदा सध्या संप करत असलेल्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आला, तर त्यांच्यावर ६ महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा दंडाच्या शिक्षेची तरतूद केली जाऊ शकते.
सरकारी कर्मचाऱ्यांवर कारवाईची तरतूद असलेले 'मेस्मा' विधेयक काल (14 मार्च) विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात कोणत्याही चर्चेशिवाय बहुमताने मंजूर करण्यात आलं. राज्यभरात संपाचा सूर आळवल्याचं पाहायला मिळत आहे. काल विधानसभेत गुलाबराव पाटील यांनी हे विधेयक मांडलं होतं. यावर कोणतीही चर्चा न करता हे विधेयक मंजूर करण्यात आलं. तसेच, वरच्या सभागृहात विरोधकांनी जुन्या पेन्शन प्रकरणी कामकाजावर बहिष्कार टाकला होता. त्यामुळे विधानपरिषदेत देखील कोणतीही चर्चा न होता हे विधेयक मंजूर करण्यात आलं आहे.
राज्यात शेतकरी आणि शासकीय निमशासकीय कर्मचारी पुन्हा रस्त्यावर उतरले आहेत. जुनी पेन्शन योजनेच्या मागणीसाठी राज्य सरकारी आणि निमशासकीय कर्मचारी आक्रमक झाले आहेत. राज्यात कर्मचारी संपावर गेले असून, राज्य सरकारने कर्मचाऱ्यांना मेस्मा कायद्यानुसार कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. आता या कायद्यांतर्गत सरकार कर्मचाऱ्यांवर कारवाई करु शकणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने मंजूर केलेला मेस्मा कायदा काय आणि तो कर्मचाऱ्यासाठी अस्त्र कसा ठरतो, है पाहणे आवश्यक ठरणार आहे. केंद्र सरकारने १९६८ मध्ये मेस्मा कायदा लागू केला.
याआधी मेस्मा कायदा लावण्याचे अधिकार फक्त केंद्र सरकारकडेच होते, पण नंतर ते राज्य सरकारांनाही देण्यात आले.
आपल्याला मेस्मा म्हणून दुसऱ्यांना संपात उतरवलं किंवा संप-आंदोलन करायला उकसवलं तरी एक वर्षाच्या तुरूंगवासाची शिक्षा आहे. संपाला आर्थिक सहाय्य दिल्यासही याच शिक्षेची तरतूद आहे. तसंच, मेस्मा कायद्याअंतर्गत बेकायदेशीर कृत्य केल्यास वॉरंटशिवाय पोलीस अटक करू शकतात. हे गुन्हे अजामीनपात्र असतात.
मेस्मा कायदा कधी आणि कुणावर लावण्यात येतो ?
मेस्मा कायदा सुरू केल्यानंतर तो ६ आठवड्यांपर्यंत किंवा ६ महिन्यांपर्यंत लागू करता येतो. या कायद्याची अंमलबजावणी केल्यानंतर संपात सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांवर कायदेशीररित्या कारवाई करण्याचा अधिकार सरकारकडे असतो. या कायद्याचं उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अटक करण्याचा अधिकारही सरकारकडे असतो.
मेस्मा कायद्याचा मुख्य उद्देश म्हणजे बेकायदेशीर आंदोलने किंवा संप थांबवणे. अत्यावश्यक सेवांमध्ये काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांनी जर साठेबाजी किंवा अत्यावश्यक सेवा विस्कळीत करत संप केला तर या आंदोलनाला रोखण्यासाठी हा कायदा लावण्यात येतो. मेस्मा लावल्यानंतरही जर, कर्मचारी संपावर कायम राहिल्यास त्याच्यावर एक वर्षांचा तुरूंगवास, दोन हजार रूपये दंड किंवा दोन्हींचीही कारवाई होऊ शकते.
आपल्याला मेस्मा म्हणून दुसऱ्यांना संपात उतरवलं किंवा संप-आंदोलन करायला उकसवलं तरी एक वर्षाच्या तुरूंगवासाची शिक्षा आहे. संपाला आर्थिक सहाय्य दिल्यासही याच शिक्षेची तरतूद आहे. तसंच, मेस्मा कायद्याअंतर्गत बेकायदेशीर कृत्य केल्यास वॉरंटशिवाय पोलीस अटक करू शकतात. हे गुन्हे अजामीनपात्र असतात.




## प्रदूषणाचा भस्मासूर रोखा



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**स्विस संस्था आयक्युएअर ने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालात भारत जगातील आठव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून दिल्ली जगातील चौथ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर असल्याचे दिसून येते. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३१ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली.**

या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर आली होती. प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. तीन वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार



सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शेतकरी जगला तरच राज्य जगेल

## शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विरोधी पक्षनेते अजित पवार सभागृहात आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात अवकाळी पावसासह गारपीठीच्या घटनेत वाढ झाली आहे. राज्यात पीकांसह, फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. हवामान खात्याने राज्याला 'यलो ॲलर्ट' दिला आहे. मात्र राज्यातील सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नावर असंवेदनशील आहे, अजूनही अनेक ठिकाणी नुकसानीचे पंचनामे सुरु करण्यात आलेले नाहीत, राज्यातला शेतकरी हवालदिल झाला आहे. राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे प्रशासन ठप्प आहे. बाजारभाव, अवकाळी पाऊस यामुळे दुहेरी संकटात असणारा शेतकरी नुकसानीचे पंचनामे होत नसल्याने तिहेरी संकटात सापडला असल्याचा घणाघात विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केला. दरम्यान राज्याचे कृषीमंत्री शेतकऱ्यांच्या प्रश्नी काहीही विधाने करुन 'अकलेचे तारे' तोडत असल्याचे सांगून कृषीमंत्र्यांचा चांगलाच समाचार घेतला. राज्यात दिनांक ५,६ व ७ मार्च रोजी अवकाळी पाऊस होऊन सर्वच पिकांचे नुकसान झालेले आहे. राज्यातील सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर गेलेले आहेत त्यामध्ये पंचनामे करणारे ग्रामसेवक, तलाठी व कृषी सहाय्यक यांचाही समावेश आहे. त्यामुळे राज्यात नुकसानीचे पंचनामे अद्याप सुरु झालेले नाहीत, ही वस्तूस्थिती आहे. जी आकडेवारी शासन सभागृहात सांगत आहे हे केवळ अंदाजाने आणि कार्यालयात बसून दिलेली आकडेवारी आहे. शेतमालाला भाव नसल्याने शेतकरी अगोदरच आर्थिक विवंचनेत असताना अवकाळी पावसामुळे अस्मानी संकट उभे राहिले आहे. आगामी चार दिवस राज्यात पावसाळी वातावरण राहणार असून २० मार्चपासून संपूर्ण राज्याला 'यलो अलर्ट' तर ११ जिल्ह्यांना 'ऑरेंज ॲलर्ट' देण्यात आलेला आहे. राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार हे 'अवकाळीने शेतीचे फार नुकसान झालेले नाही' अशी वक्तव्ये करुन 'अकलेचे तारे' तोडून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहेत याबाबत अजित पवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला. दरम्यान अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे तातडीने सुरु करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणीही अजित पवार यांनी केली.



# सरन्यायाधीशांना ट्रोल करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हायला हवी

## नाना पटोले : संतांचा अपमान करणाऱ्यांना महाराष्ट्रात पाय ठेवू देणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु असताना मा. सरन्याधीशांनी जी निरिक्षणे नोंदवली, ताशेरे ओढले यातून निर्णय आपल्याविरोधात जातो की काय या भीतीने मा. सरन्यायाधीशांनाच काही लोकांनी ट्रोल केले हे लांछनास्पद आहे. ट्रोल करण्याची भाडोत्री व्यवस्था कोणाकडे आहे हे सर्वांना माहित असून सरन्याधीशांना ट्रोल करण्याची हिम्मत करणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, म्हणूनच काँग्रेसचे खासदार राष्ट्रपती यांच्याकडे दाद मागण्यासाठी गेले आहेत, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, भाजपा किती सत्तापिपासू आहे याचा अंतच नाही, राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार पाडताना सुरतेपासून गुवाहाटी पर्यंत काय-काय झाले, राज्यपालांनी पदाचा कसा दुरुपयोग केला, या सर्व घटना आपण सर्वांनी पाहिलेल्या आहेत. सुनावणीदरम्यान न्यायाधिशांनी जे काही प्रश्न विचारले, निरीक्षणे नोंदवली यावर त्यांना ट्रोल केले गेले, हा ट्रोल करण्याचा प्रकार गंभीर आहे. केंद्रातील सरकारवर कोणाचाच विश्वासच राहिलेला नाही म्हणूनच राष्ट्रपतींकडे दाद मागण्यासाठी काँग्रेस खासदार गेले आहेत. सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालय काय निकाल देईल यावर भाष्य करणे योग्य नाही परंतु मंत्रालयात लगबग सुरु झाली असल्याची माहिती मिळत आहे, त्यामुळे त्यांना काहीतरी चाहुल लागली आहे असे वाटते. साधारणतः सरकारचा कालावधी संपताना किंवा सरकार जाऊ शकते अशी वेळ येते त्यावेळी अशी लगबग सुरु असते. आम्ही सर्वोच्च न्यायलयातील निकालाची वाट पहात आहोत, असा टोला पटोले यांनी लगावला.

संतांचा अपमान करणाऱ्यांना महाराष्ट्रात पाय ठेवू देणार नाही. धीरेंद्र शास्त्री या बाबाचा मीरा रोड येथे कार्यक्रम होत आहे, त्यानी काय प्रवचन करावे हा त्यांचा अधिकार आहे. परंतु या व्यक्तीने जगतगुरु संत तुकाराम महाराज यांच्याबद्दल अपमान करणारे विधान करुनही शिंदे सरकार त्यावर कारवाई का करत नाही? असा आमचा सवाल आहे. आम्हाला आमचे संत महत्वाचे आहेत, त्यांचा अपमान आम्ही सहन करणार नाही. संतांना आपल्या जिवनात महत्वाचे स्थान आहे. अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पाची सुरुवातही संत तुकाराम महाराज यांच्या अभंगानेच केली. संतांच्या विचारात मोठी ताकद आहे. भ्रष्ट विचाराचे कोणी स्वतःलाच संत म्हणून घेत असेल तर ते बरोबर नाही. आमच्यासाठी संत तुकाराम महाराज हे सर्वश्रेष्ठ आहेत. महाराष्ट्रात येऊन जर संत तुकाराम महाराज यांचा कोणी अपमान करत असेल तर ते अजिबात चालणार नाही. संतांचा अपमान करणाऱ्यांना आम्ही महाराष्ट्रात पाय ठेवू देणार नाही, असा इशाराही काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी दिला.




# सात हजार एकरावरील द्राक्षबागांना अवकाळीचा फटका

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** जिल्ह्यात द्राक्ष काढणीचा हंगाम सुरू झाला आहे. अशातच अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना मोठा दणका दिला आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला जातो की काय, अशी भीती निर्माण झाली आहे. अवकाळी पाऊस आणि ढगाळ हवामानामुळे द्राक्ष खरेदीकडे व्यापाऱ्यांनी पाठ फिरवली आहे. त्यामुळे द्राक्षाचे भाव ढासळले आहेत. याबरोबरच निर्यातक्षम द्राक्षालाही फटका बसला आहे. दोन दिवस सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे द्राक्ष घड कुजण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. तर काही ठिकाणी तीव्र उन्हामुळे द्राक्षाचे मणी फुटू लागले आहेत. गेल्यावर्षीदेखील अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. योग्य बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांना शेतातले द्राक्ष तोडून टाकण्याची वेळ आली होती. अशीच परिस्थिती यंदाही निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असल्याचे स्थानिक द्राक्ष शेतकरी आबासाहेब देशमुख यांनी सांगितले.

महाराष्ट्र Business Katta












# अनोखा गाव नांदव्या : शंकर अण्णा

आधुनिक केसरी

**'गाव तिथं बारा भानगडी' ही लोक म्हण समाजजीवनात रूढ आहे. पण प्रत्येक गोष्टीला अपवाद असतो. तेच अपवाद आपले वेगळेपण समाजजीवनात दृढ करतात. माझं गाव मन्याड नदीच्या काठावरच बाचोटी ता. कंधार जि. नांदेड. गावात अठरापगड जाती‍ गुण्यागोविंदाने नांदतात. याला कारणीभूत आहे तिथली सहिष्णुता.**

गावात मारुती, दत्तात्रीचा मठ, पिर बाबू, तीन खंडोबा, मरूमाय, पोचेमाय, दाऊल मलीक, भवानी, राजबक्षा, कटमदेव, पाच गावची सटवाई ही लोकदैवतं मानणारा वर्ग आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींपासून ते थेट लोकशिक्षक संत गाडगेबाबा या माझ्या हजारो पूर्वजांच्या जाच, जुलूम, विद्रोह, दुःख, वेदनांच्या तक्रारीचा पाऊस अठ्ठावीस युगे हसत अंगावर झेलणारा विठ्ठलही काही दिवसांपूर्वीच नरशाचे अस्तित्व बाजूला सारून तिथं विराजमान झाला आहे. तसाच फुले-आंबेडकरांसोबत बुद्धाचा करुणामय जीवनमार्ग 'प्रज्ञा-शील-करुणा' विहारातून दाखवणारे डी. पी. वाघमारे गुरूजी आमच्याच मातीत जन्मले.

गावात शंकर अण्णा धोंडगे नावाचा 'गाव नांदव्या' जन्मला, वाढला, मोठा झाला आणि आपल्या कृतीतून एक आदर्श त्यांनी जन्माला घातला. आपल्या कर्तृत्वासोबत गावाचे नावही जागतिक पातळीवर नेले. म्हणून आज आमच्या गावाला 'शंकर अण्णांची बाचोटी' अशी ओळख मिळालेली आहे.

गावाच्या तीनही बाजूला माळं आहेत. खंडोबाचा माळ, तांबडटेकडी, मव्हदरा, बोंबलदरा, वडाचा माळ, गायवाडा आणि भूतखेळा हे शेकडो वर्षे झाली आपलं अस्तित्व टिकून आहेत. दुसऱ्या बाजूनं मन्याडीचा सुपीक गाळपेरा. गावातली आमराई जिल्ह्यात आस्कारलेली. खुदबूची आमराई, मुकदमाची आमराई, सरकारी बागेतील अनेक नामवंत आंबे बाचोटीची ओळख शेकडो वर्षे झाली सांगताहेत. त्यामुळे गावाला बऱ्यापैकी सुबत्ता आहे.

गावात जन्मणारा प्रत्येक माणूस हा भोंगळा असतो. जन्मापासून ते मरणापर्यंतचा सर्व प्रवास लोकांच्या ध्यानी मनी असतो. मात्र जी माणसं आपल्या कृतीने आणि वृत्तीने समाजमन घडवितात त्यांचा यथोचित सन्मान गाव करत असतं.

शंकर अण्णा धोंडगे यांचा जन्म एका चांगल्या शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील गणेशराव रघुनाथराव धोंडगे हे गावचे सरपंच. आमच्या गावाला योगीराज निवृत्तीनाथ महाराज यांचा स्पर्श होताच. योगीराजाच्या वाणीतून कधी कुणाचे 'बार' झाले, हे गावाने ऐकलेले, अनुभवलेले होते. 'खापरकुटी' कुणाच्या घरातून त्यांनी काढून घेतली, याचेही साक्षीदारही होते. त्यामुळे गावात जात-पात ही भानगडच नव्हती. गावातील कोणत्याही चेलम्यावर आणि विहीर, तळ्यावर आणि नंतर नळावर कोणीही कुठेही कधीही पाणी भरताना किंवा वावरताना 'बाट' नव्हता. माझं आजोळ पाताळगंगा ता. कंधार जि. नांदेड. इथे मात्र आम्हाला बाट काय असतो, याची जाणीव होत. पण गावातील संस्कारामुळे मी, मोठी बहीण इतक्या धट्टपणाने तिथल्या लोकांच्या अंगावर जात की, ते ढोर बुजल्यासारखी बुजायची. माझा आजोबा शाहुजी हा मन्याड नदीवर मासे धरायचा. त्याचे मासे सगळं गाव आणून खात. त्यावेळी कुणालाच बाट होत नव्हता, मात्र गावात आल्यानंतर त्यालाच वरून पाणी वाढलं जायचं. हे भारतीय समाजाचं ढोंग बघतच आम्ही मोठे होते गेलो. पण माझ्या गावात हा प्रकार नव्हता. इतक्या नितळ गावात शंकर अण्णा धोंडगे यांची कारकीर्द सुरू झाली.

दरम्यानच्या काळात शेतकरी संघटनेची चळवळ सुरू झाली होती. हे साल १९८५ चं असावं. कारण मला नेमकंपणनं सांगता येत नाही. याच चळवळीत शंकर अण्णा ओढल्या गेले. स्वतः पदवीधर असूनही नोकरीच्या नादी न लागता ते शेती, सिंचन या जिव्हाळ्याच्या चळवळीत रमले. यासाठी त्यांनी खूप कष्टही घेतले. रात्री नांदेडहून अमरावती गाडीने आल्यानंतर गावाकडे यायला कोणतच वाहनं किंवा साधन उपलब्ध नसताना रात्री-अपरात्री कंधारच्या रस्त्यावर केळीच्या गाड्यावर विश्रांती घेऊन त्यांनी शेतकरी संघटनेची कामे केली, हा अनुभव अनेक लोक सहजपणे सांगतात. इतका त्याग, कष्ट घेऊन लोकचळवळ जगणारा नेता म्हणूनच अण्णांकडे पहावे लागेल. गावातील राजकारण ज्यावेळी शंकर अण्णा यांच्या भोवती रुजत गेलं. वाढत गेलं. त्यावेळी ते राजकारण समाजकारणात विलीन केलं. ही गोष्ट विचार थक्क करणारी आहे. कारण त्यांच्या कृतीला गावानेही कधीच विरोध केला नाही. केवळ चार-पाच घरं अपवाद सोडता त्यांना विरोधक कोणी नव्हतं.

महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यात शरद जोशी यांच्या तोडीचं लोकनेतृत्व म्हणून ते वावरत होते. त्यांनी शरद जोशी यांच्यासोबत जी काही आंदोलनं केली, त्यास कुठेच तोड नाही. शेतकरी संघटना म्हणजे केवळ आंदोलन, तोडफोड आणि शासकीय मालमत्ताची नासाडी एवढीच ओळख होती. पण यामागे लोकशाहीमध्ये उपद्रव दिल्याशिवाय शासन व्यवस्था जागची हलत नसते, हा पूर्वानुभव होताच. त्यामुळे त्यांना या पद्धतीने आंदोलने करावी लागली. या आंदोलनासाठी जीवाचं रान करणारी, जीवावर उदार झालेली माणसं तयार झाली होती. गॅट करार, डंकेल प्रस्ताव, खुली अर्थव्यवस्था, भीक नको हवे घामाचे दाम, पुढाऱ्यांना गावबंदी, क्यू या उपक्रमासोबत अनेक विविध मागण्या लावून धरत लोकांच्या मनात स्वत्वाची जाणीव तयार करून देणारा नेता म्हणूनच शंकर अण्णांची ओळख आहे. आमच्या गावात अण्णा आज येणार आहेत, इतकीही चाहुल्‌ लागली की, बसस्टँडला घोडकेच्या हॉटेलजवळ शेकडो माणसं येऊन थांबायची. प्रत्येकाच्या खिशाला लाल रंगाचा संघटनेचा बिला असायचा. तिथं गर्दी लोकं करायची. त्यावेळी आम्ही आठवी-नववीच्या दरम्यान शिकत होतो. शेतकरी संघटनेच्या वतीने शेकडो आंदोलने महाराष्ट्रात उभी राहिली. वाढली. व्यापक झाली. याचे केंद्र आमचं गाव होतं. या आंदोलनाच्या माध्यमातून एका हाकेवर महाराष्ट्र बंद आणि चालू करणारा नेता म्हणजे शंकर अण्णा होत.

दहावी-बारावी झाल्यानंतरही मी त्यांच्या कोणत्याच आंदोलनात नव्हतो. कारण आमचा मित्रकॅम्प वेगळा होता. त्यामुळे त्यांच्या आंदोलनात मला कधी जवळीकता साधता आली नाही. मात्र एकदाचं गाव सुटलं आणि औरंगाबाद गाठलं. त्यावेळी शरद जोशी यांच्या काही पुस्तकाचा संबंध आला. यासोबत वेगवेगळ्या चळवळी समजून घेता आल्या. अभ्यासता आल्या. त्यावेळी शंकर धोंडगे या व्यक्तीबद्दल एक आस्था वाढत गेली. गावोगावी असणारी सरंजामी प्रवृत्ती आणि माझ्या गावातील सामाजिक पर्यावरण हे शेकडो वर्षांचा अंतर होता. त्यामुळे शंकर अण्णांबद्दल एक आदर वाढत गेला. आणि मागची तीन दशकं शंकर अण्णांनी गावात



राबविलेले उपक्रम सहजच डोळ्यांसमोर येत गेली. पहिल्यांदा अकराच्या अकरा महिला ग्राम पंचायत सदस्य करणे, मंडल आयोगाचे आरक्षण नसतानाही महिलांच्या हाती कारभार देणं, गावात पहिल्यांदा वामन दहन, बळीराजा जयंती, गावातील भांडणांची केस पोलीस स्टेशनला जाऊ न देणं, गावातली प्रकरणं गावगाड्यातच मिटवून सलोख्याने गाव नांदवण्याची कला मला कुठेच दिसली नाही. पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्राच्या समाजकारणात अनेक गावात वाद-विवाद, जातीय समीकरणं पाहता माझं गाव कधीही इतरांपेक्षा उजवंच मला अनुभवता आलं.

गावातील अडी-अडचणीसोबत गावात निर्माण होणारे पेचप्रसंगीही शंकर अण्णांच्या केवळ भक्तीवर आणि श्रद्धेवर गावातील लोकांनी गावातच मिटवून गावची इज्जत ठेवली. यासाठी शंकर अण्णांनी गावच्या मनाची तशी मशागत केली होती. ज्या ज्या वेळी अण्णा गावात असत त्यावेळी प्रसंग वाढण्याची आणि चिघळण्याचा प्रश्नच नव्हता. चळवळी आपल्या कामातून नकळतपणे समाजजीवनात विचार पेरत असतात. तसाच फुले-शाहू-आंबेडकर ही त्रिसूत्री शेतकरी संघटनेच्या माध्यमातून विशेषतः स्वतःला सवर्ण, उच्च समजणाऱ्या वर्गात रुजवल्या गेली. यामागे शंकर अण्णांच्या पूर्वजांचे संस्कार आहेत. कारण त्यांचे वडील सरपंच असतानाही पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांनाही कपबशीत चहा मिळत होता, असे लोक चिचच्या वट्ट्यावर बसून सांगत.

महाराष्ट्राच्या समाजजीवनात वावरताना पत्रकार म्हणून जे अनुभव आले. ते भयंकर विदारक आहेत. गावातीलच नेता गावात दोन भाग करून आपलं कोण आणि परकं कोण करतो. एकसंध नांदणाऱ्या गावात भांडणं पेरून आपली पोळी भाजून घेतो. मात्र शंकर अण्णा यांनी चळवळीसोबत राजकारणात प्रवेश केला. लोकप्रतिनिधी म्हणूनही काम केले. मात्र यासाठी त्यांनी गावात फूट पाडली नाही. स्वतःच्याच नाही तर आपल्या कार्यक्षेत्रातीत येणाऱ्या कोणत्याही गावात विषाची पेरणी केली नाही. त्यामुळे त्यांच्याबद्दल विरोधकांतही एक विलक्षण आदरभाव आहे.

अनेक नेते, पुढारी आपल्या हितसंबंधासाठी आपल्याला आडवा येणारा, विरोध करणारा एखाद्या पेचप्रसंगात अडकला तर त्याचा काटा काढतात. मात्र शंकर अण्णा यांनी 'जाऊ द्या ज्याचं त्याच्यासोबत' म्हणून दुर्लक्ष करताना मी अनुभवलंय. आपला विरोधक कचाट्यात सापडला तर त्याला पुन्हा उभाच राहता येऊ नये, यासाठी काही लोक काम करतात. पण सत्प्रवृत्ती ही कधीही, 'दुसऱ्याच्या नाशात आनंद मानत नाही.' याची साक्ष शंकर अण्णाच्या जीवनप्रवासाकडे बघताना ठायी ठायी दिसते.

गावची जत्रा, गावचं राजकारण, गावातील सप्ताह, गणपती अशा कार्यक्रमात अनेक गावात वाद, भांडणे, तंटे यांनी पोलीस स्टेशनच्या फाईल गच्च भरल्या आहेत. मात्र यापेक्षाही कौटुंबिक वादही शंकर अण्णांनी गावात मिटवून पोलीस स्टेशन आणि कोर्टाच्या कचाट्यातून गाव वाचण्याचे काम सलग तीन दशके केलं आहे, याची साक्ष पंचक्रोशी आहे.

आमच्याच गावाच्या बाजूला शंभर घराच्या गावातली भांडणं पोलीस स्टेशनच्या दरबारात गाजली. पण गावानेही शंकर अण्णांच्या भूमिकाचा आणि त्यांच्या नावलौकिक इज्जतीचा विचार केला. गावचा नेता महाराष्ट्राच्या आणि पर्यायाने देशाच्या समाजजीवनात नाव कमावलेला आहे. त्याच्या इभ्रतीला कुठेही डाग लागू नये, याची काळजी घेतली. तितक्याच मायेनं शंकर अण्णांनीही गावाला जपलं. गावाला जीव लावला.

शंकर अण्णांच्या उदयाअगोदर वाखरड एक आमच्या शेजारचं गाव. तिथं कोणत्याच मार्गाने बस किंवा वाहनाची सोय नव्हती. एकमेव टोकऱ्याचा आधार घेऊन आमचं गाव गाठावं लागत. पण तिथल्याच गोविंदराव पाटील यांनी आमच्या सात-आठशे घरे असणाऱ्या गावच्या जत्रेचा कारभार वीस वर्षे पाहिला. मात्र शंकर अण्णांनी नकळतपणे हा परगावी कारभार मोडीत काढून गावच्याच माणसांना कारभारी करण्याची किमया केली. गावात सलग तीस वर्षे ग्राम पंचायत बिनविरोध करून गावात कोणताच मतभेद उभा राहू दिला नाही. जो विरोध करील त्यालाच लोकप्रतिनिधी होण्याची संधी अण्णांनी दिली.

इतकं शांत, संयमी, एकमेकांची टिंगळ-टवाळी करणारं, मोकळेपणानं खल्‌खल हसणारं, अनेक मराठी शब्दांना जन्म देणारं, टोपण नावाचा तर खजाणाच भरलेलं माझ गाव. असं एकही घर गावात सापडणार नाही की, त्या घराला टोपण नाव नाही. गावात मनभेद नाही. मतभेद नाही. 'बाचोटी की बातच कुछ और है। बात चोटी की है।' म्हणणाऱ्या गावाचं नेतृत्व म्हणजे शंकर अण्णा धोंडगे. याच मातीत लोककवी यमक्या छत्रपतीचा नागोराव पाटील जन्मला, कवी श्रीरंग वाघमारे महाराष्ट्राच्या मनात 'आई तुझी आठवण मी सांग कसा विसरू' हे गाणं देऊन गेला, नाटककार संकेत वाघमारे काळोखात विझणाऱ्या ज्योतीची कहाणी सांगत राहिला. याचं मला नेहमी अप्रूप आणि अभिमान वाटत आला.

गाव सोडून मला जवळपास वीस वर्षे होऊन गेली. पण मी गावाचं नातं तोडलं नाही. गावात येणं-जाणं सुरूच आहे. मी अण्णांच्या कधीच संपर्कात नाही. पण हा माणूस मला सतत माझ्या नजरेसमोर दिसत राहतो. कायम आऊट ऑफ कव्हरेज राहणारा माझा स्वभाव; पण माझ्या नजरेच्या रेंजमध्ये काही नावे आहेत. त्यात शंकर अण्णाही विराजमान आहेतच.

शेतातल्या ऊसाच्या पाचटापासून ते थेट जागतिक पातळीवरच्या बाजारपेठा, अर्थकारणावर अभ्यास असणारं लोकनेतृत्व म्हणूनच त्यांची ओळख. त्यांचे भाषण म्हणजे एक संवादच. तिथे कुठलीच कलात्मकता नाही. फार जागतिकही नाही अन्‌ अगतिकही नाही. रोजच्या प्रश्नाला हात घालून लोकभावना उजागर करत जाणे, लोकांची भूमिका बदलत राहणे आणि आपल्याला हवे तसं लोकांच्या गळी उतरवणे, इतकी साधी मांडणी.

शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतीच्या प्रश्नांची उकल होत नाही, ही जाणीव ठेवून 'स्वतंत्र भारत पक्षा'ची स्थापना झाली. या पक्षाच्या वतीने शंकर अण्णांनी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका लढवल्या. सभेला लाखो जमणारी मंडळी मतदानात त्यांना हुलकावणी देत होती. शेतकरी संघटना कमजोर होत गेली. याचे मुख्य कारण म्हणजे प्रदेशाध्यक्ष शंकर अण्णा धोंडगे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश. किसान सभेच्या माध्यमातून ते कार्यरत राहिले. शेवटी २००९ मध्ये विधानसभेत ते विराजमान झाले.

गावातील माणसं, नेते पद, प्रतिष्ठा आणि पैशाने मोठी होत गेली की, सामान्य माणसांना त्यांचा जाच, जुलूम सहन करावा लागतो. मात्र शंकर अण्णा आमदार झाल्यानंतरही त्यांच्या वागण्यात तसा कुठ फरक जाणवला नाही. ते पूर्वीसारखेच जगत राहिले.

समाजजीवनात दहशतीची भिती कितीही मोठी असली तरी ती मोडून काढता येते; मात्र आदरयुक्त भिती कशानेही मोडता येत नाही. कारण त्या आदरासाठी ती व्यक्ती समाजासाठी झिजलेली असते. हा आदर शंकर अण्णांनी गावाच्या मनात कमावला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक क्रांतीची चळवळ समजून घेण्यासाठी मी महाराष्ट्राच्या अनेक कोपऱ्यात फिरलो. गावगाड्याबद्दल जाणून घेतलं; पण मन्याडीच्या टापूतील माझ्या गावची बला मला कुठेच सापडली नाही. गावोगावी एकमेकांच्या लाथळ्या लावून आपलं नेतृत्व सिद्ध करणाऱ्या स्थितीत गाव स्थिर राहावं, गावात तंटा वाढू नये, यासाठी राजकीय लाभ लाथाडणारा अनोखा 'गाव नांदव्या' माझ्या अनुभवात शंकर अण्णांसारखा दुसरा नाही. शंकर अण्णांवर लिहिले तर चांगला मोठा ग्रंथ होऊ शकतो, मात्र तुर्तास इतकेच!

**वैजनाथ वाघमारे**
**(आगामी 'भावलेली माणसं' या पुस्तकातील एक लेख)**

# जी-२० समितीमुळे देशाचा सन्मान वाढेल



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**पूर्व आशिया आणि आग्नेय आशियात १९९७ साली आलेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर जी २० समिती उदयास आली आणि ठरविण्यात आले की जागतिक आर्थिक संकटाचा सामना करण्यासाठी प्रमुख देशांनी एकत्र येऊन प्रयत्न करावे हा मुख्य उद्देश बाळगुन जी २० अस्तित्वात आली. जी२० चे नेतृत्व २० देशातील प्रत्येक देशांना दरवर्षी भुषवावे लागते.कारण यामुळे अनेक विषयांवर चर्चा करून आदानप्रदान होवून नवी दिशा मिळण्यास मदत होते एक नवीन ऊर्जा निर्माण होते.**

२०२३ हे वर्ष भारतासाठी गौरव निर्माण करणारे ठरणार आहेत.कारण जी २० समितीचे अध्यक्ष भारताकडे असल्याने संपूर्ण भारतात जय्यत तयारी सुरू असल्याचे दिसून येते. त्याच प्रमाणे जगात भारत शांतीचे प्रतीक असल्याने २० देशांसह संपूर्ण जग भारताकडे मोठ्या आशेने पहात आहे की यावेळेस भारत जगातील देशांसाठी नवीन ऊर्जा निर्माण करेल.जी २० च्या वेगवेगळ्या विषयांवरील चर्चा व आदानप्रदान करण्यासाठी देशातील वेगवेगळ्या राज्यातील प्रमुख शहरांमध्ये २०० हुन अधिक बैठका होणार आहेत आणि या २०० ही शहराकडे जी २० देशांसह जगाचे लक्ष रहाणार आहे.कारण आर्थिकदृष्टया किंवा इतर समस्यांच्या बाबतीत भारताची प्रत्येक भुमिका नेहमीच जगावेगळी,रोखठोक व महत्वाची रहाली आहे आणि जगाने भारताच्या प्रत्येक भुमिकेचे स्वागतच केले आहे.त्यामुळे जगात भारत तिसऱ्या शक्तीच्या रूपात उदयास येत असल्याचे आपण पहातो.जी२० ही जगातील वीस प्रमुख विकसित आणि विकसनशील अर्थव्यवस्थांची संघटना आहे.यामध्ये भारत, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, इंडोनेशिया, इटली, जपान, कोरिया प्रजासत्ताक, मेक्सिको, रशिया,सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, युनायटेड किंग्डम, युनायटेड स्टेट्स आणि युरोपियन संघांचा समावेश आहे.जगात जी२० देशाची मोठी भुमिका आहे.कारण जगाच्या एकूण जीडीपीच्या ८५ टक्के जीडीपी जी २० देशातुन येते, जागतिक व्यापारातील ७५ टक्क्यांहून अधिक व्यापार जी २० देशात एकवटला आहे, जगातील ६० टक्के लोकसंख्या जी २० देशांमध्ये आहे.त्यामुळे जी २० हळूहळू आर्थिकदृष्टया बळकट होतांना दिसत आहे. यावर्षीचे यजमान पद भारताला मिळाल्याने भारताने बांग्लादेश, इजिप्त, मॉरिशस, नेदरलँड्स, नायजेरिया, ओमान, सिंगापूर,स्पेन, आणि युएई या देशांना सुध्दा निमंत्रण दिले आहे.जी २० समितीच्या महाराष्ट्र एकुण १४ बैठकी होणार आहेत.मुंबईत ८ तर पुण्यात ४ तर नागपूर आणि औरंगाबाद येथे एक -एक बैठक होणार आहे.यात संयुक्त राष्ट्रे, जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, वर्ल्ड बँक अशा आंतरराष्ट्रीय संघटनांचे प्रमुख तसेच काही देशाचे पाहुणे म्हणून शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत.यामुळे देशाची मान जगात उंचावेल.जी २० देशांमध्ये भारत आर्थिकदृष्टया ५ व्या क्रमांकावर आहे म्हणजेच आज जागतिक दृष्ट्या भारत मजबूत स्थितीत आल्याचे दिसून येते.नागपूरमध्ये जी २० समितीची बैठक २१ आणि २२ मार्चला होणार आहे या बैठकीत ४० देशांचे १४० प्रतिनिधी प्रामुख्याने सहभागी होतील त्या अनुषंगाने संपूर्ण संत्रानगरी सुशोभित झाल्याचे दिसून येते.कारण जी २० च्या माध्यमातून नागपूर हे जगाचा केंद्रबिंदु बनु शकतो व जागतिक शहर म्हणून जी २० च्या माध्यमातून प्रसिद्धीस येवू शकते.तसे पहावे तर नागपूर हे पुर्वीपासूनच जग प्रसिद्ध आहे.कारण आपल्याला नागपूरात व नागपूरच्या आसपास नामांकित स्थळे पहायला मिळतात.ज्या ठिकाणी जगातील अनेक पर्यटक येतात दिक्षाभुमि,ताजुद्दीबाबाचा दर्गा ताजबाग, प्रसिद्ध गणेश टेकडी, दीक्षाभूमी,चर्च, गुरूद्वारा, कोराडी मंदिर,रमन सायन्स केंद्र, अशा अनेक प्रसिद्ध टीकान व वास्तुमुळे नागपूरला मोठी प्रसिद्धी प्राप्त झाली आहे.त्याचप्रमाणे नागपूरसह संपूर्ण विदर्भ संत्रा उत्पादनाचे माहेरघर आहे.त्यामुळे आज नागपूर हे संत्रानगरी म्हणून भारतासह जगप्रसिद्ध आहे. परंतु जी २० च्या माध्यमातून नागपूर जगाच्या केंद्रस्थानी रहावा या उद्देशाने कार्य सुरू आल्याचे दिसून येते.कारण विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांत संत्र्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते आणि नागपूरच्या संत्र्याचा गोडवा जगभरात प्रसिद्ध आहे.नागपुरातुन जगातील अनेक देशांमध्ये संत्र्याची निर्यात केली जाते.त्याचप्रमाणे संत्र्यापासुन संत्रा बर्फी,संत्रा ज्युस इत्यादीसह वेगवेगळे पदार्थ संत्र्यापासुन बनवुन निर्यात केली जाते. त्याचप्रमाणे संत्रा आरोग्याच्या दृष्टीकोणातुन पाचक व शक्तीवर्धक आहे.त्यामुळेच नागपूरला संत्रा नगरीचा दर्जा प्राप्त झालेला आहे.ही ऊर्जा संपुर्ण जगभर पसरावी अशी नागपूर वासीयांची इच्छा आहे.कारण जी २० ही आंतरराष्ट्रीय बैठक आहे त्यामुळे संपूर्ण जगाचे लक्ष या बैठकीवर आहे.भारताची वाटचाल अती वेगाने उंच भरारी घेत आहे ही बाब जी-२० च्या भारतात होत असलेल्या बैठकांवरून लक्षात येते.जी-२० ची बैठक भारतातील वेगवेगळ्या शहरांमध्ये आयोजित करण्यात आलेली आहे.या बैठकीत २० देशांचे मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहुन वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करून पुढील रूपरेषा ठरविण्यात येत आहे.भारतीय संस्कृती जी २० परिषदेला नवीन दिशा देवुन जगात शांतता प्रस्थापित अवश्य करेल अशी मला खात्री आहे.या लेखाच्या माध्यमातून जी २० देशांना विनंती करतो की रशिया-युक्रेन युध्दाला ताबडतोब पुर्णविराम लागावा या उद्देशाने सर्वांनीच पाउले उचलावीत व महायुध्दाच्या वाटेवरून जगाला बाहेर काढावे आणि जगात शांतता प्रस्थापित व्हावी हाच उद्देश सर्वांनीच ठेवला पाहिजे.कारण जी २० मध्ये अनेक बलाढ्य देश आहेत. त्या संपूर्ण ठिकाणी पाहुण्यांच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे. यामुळे जगात एक चांगला संदेश जाईल व पर्यावरण सुधारण्यास मोठी चालना मिळेल.कारण जगाला निसर्ग वाचविण्याची नितांत गरज आहे.

# स्वप्नपंखी

आधुनिक केसरी

**"Life is either challenge or an adventure if it is none ,it is not a life at all."**
**हेलन केलर यांचे हे सुप्रसिद्ध असं जीवनावरचे भाष्य. "जीवनात साहस किंवा आव्हान हवंच त्याशिवाय जीवन हे जीवन नव्हेच!" विलक्षण अपंगत्व आणि त्याचबरोबर अचंबित करणारे कार्य बघितलं की पटकन हेलन केलरच्या या जीवन भाषेची आठवण होते .परमेश्वराने दिलेल्या आयुष्याचं सोनं करून जगण्याची एक आस दाखवणारे आणि आदर्श वाटणारे एक व्यक्तिमत्व म्हणजे सुलोचना महाशद्बे.**

सुलोचना महाशब्दे म्हणजे माझी सुलू मावशी. तिचं अपंगत्व हे एका दृष्टिक्षेपात नजरेत भराव असंच आहे. अडीच फुटी देह ,चालताना धनुष्याकृती होणारा ,हाताचा टेकू दिल्यावर गती घेणारे दुबळे पाय. हे अपंगत्व ही जन्मजात देणगी. तिला पाहिल्यावर ती किती परावलंबी असेल याची कल्पना येऊन मनात प्रथम कणव निर्माण होते, मन नकळत चुकचुकतं. पण शरीराची उंची आणि तिच्या धाडसाची अर्थात ध्येयाची उंची बघून मात्र तिच्या अपंगत्वाची छबी धुसर होऊन प्रत्येकाचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून जातो. सुलु मावशी नेहमी एक वाक्य म्हणत असे,' स्वतःच्या दुःखाला कवटाळत बसण्यापेक्षा ध्येयाच्या रस्त्याने हिम्मतीने पाऊल टाकणे म्हणजेच आयुष्य '. जन्मताच अपंग त्यातच तिच्या दुबळ्या पायांवर उकळतं तेल सांडल्यामुळे पायाच्या नसा जमुन गेल्या..... त्याबरोबरच कधीकाळी ती बरी होईल ह्या आशेने चाललेले नवस ,पुजपाठ ,ठरविलेले उपचार पण थांबले . तरीही आपल्या या शारीरिक परिस्थितीवर तिने मात केली ,ह्या परिस्थितीसाठी तिने कधीही स्वतःच्या नशिबाला किंवा परमेश्वराला दोष दिला नाही. तशी ती पहिल्यापासूनच देवभक्त रोज पहाटे लवकर उठणे, बगीच्यातून देवासाठी फुलं काढणे ,आजोबांन बरोबर देवाची पूजा करणे, गजानन महाराजांची पोथी वाचणे आणि त्याचबरोबर आपल्या हातापायांची सांगड घालत पंचवटी ते काळाराम मंदिर म्हणजे जवळजवळ तीन किलोमीटर पायी पायी देवदर्शनाला जाणे हा तिचा नियम सर्वांनाच अचंबित करायचा .

लहानग्या सुलुला शाळेत जाण्याची फार हौस शिक्षणाचा विलक्षण ध्यास पण ,आपल्या शारीरिक अपंगत्वामुळे अनेक अडचणींवर मात करून शिक्षण घेणे म्हणजे एक दिव्यच होते. पण म्हणतात ना 'मुलाचे पाय पाहण्यात दिसतात' हेच खरे.

तिच्या शारीरिक परिस्थितीला बघता तिला कोणीही शाळेत प्रवेश द्यायला तयार नव्हते .तिची जबाबदारी कोण घेणार ? कोणी खेळताना ढकललं पाडलं तर नसती आफत, आधीच ती दुबळी नसतं संकट कोण ओढवून घेणार .शाळेची प्रवेशद्वार तिच्यासाठी बंद झाली होती ,पण तिची शाळेची ओढ मात्र त्यामुळे आणखीनच तीव्र झाली. मग काय वडिलांनी शेवटी घरी शिकवणी ठेवली आणि चौथीपर्यंतचे शिक्षण झाले .पण 'मला आता असे शिकवणीचे शिक्षण नको मला शाळेत जायचे' हा एकच हट्ट .अखेर खूप खटपटीनंतर तिला शाळेत प्रवेश मिळाला .आणि.....जेमतेम सातवी पर्यंतच शिक्षण झाले. कारण जिथे तिथे आड येत होते ते तिचे विचित्र अपंगत्व. आणि त्यातून मुलीची जात किती तो त्रास आणि किती तो प्रयास शेवटी निर्णय घेण्यात आला की बस आता इथे शिक्षण थांबवायचे.

सुलुला शिक्षणाबरोबर स्वावलंबी होण्याचा ध्यास होता, त्यामुळे विणकाम, भरतकाम शिकून त्यातही ती निपुण झाली . "वा फारच छान केलं" असं भरभरून कौतुक केलं जायचं, पण तिला त्यात समाधान नव्हतं शरीर दुबळ होतं ,पाय दुबळे होते पण मन ते कुठे दुबळं होतं ! ते तर सदैव आकाशात झेप घेत असायचं, स्वप्न होतं ते स्वतःच्या पायावर उभे राहण्याचं. आणि विणकाम ,भरतकाम हे किती वेळ चालणार आणि ह्यावरून स्वावलंबी व्हायचं तर हे तर फारच तोकड आहे, अपूर्ण आहे या सगळ्या विचारांनी तिचं मन अस्वस्थ व्हायचं. मग शिवणकाम सुरू केलं पाय मशीन वरच शिवण शिकू लागली. छोटे छोटे दुबळे पाय पण मनाची जिद्द तशाच पायांनी शिवण शिकली. शिवणकामाचा डिप्लोमा झाला, पण तरी समाधान कुठे ! परत तेच शिक्षण आणि फक्त शिक्षण . शिक्षणापासून आपण दूर होत आहोत ही खंत मनाला स्वस्थ बसू देईना.

शिक्षणाची ओढ सतत मनाला टोचणी देत होती आणि एक दिवस सुलू ने पक्का निर्णय केला आपण बालवाडी काढायचीच . घरातून आई-वडिलांचा सुलुला तिच्या ह्या कामाला मदत नव्हती, पण हो विरोधी नव्हता. होती ती काळजी कारण स्वतः शारीरिक दृष्ट्या अशा परिस्थितीत असताना ही भलतीच जबाबदारी ...... तिला पेलवेल का ? आणि नाही पेलावली, अयशस्वी ठरली तर ती निराश तर होणार नाही. स्वतःच्या आयुष्यात नको ते अपयशाचे दुःख तिला भोगावे तर लागणार नाही. असा त्यांचा तिला नाही म्हणण्याचा स्वच्छ हेतू होता .त्यातून परमेश्वर कृपेने तिच्याकडून आर्थिक दृष्ट्या कमाई ची घराला मदतीची गरज तर नव्हतीच. तरीदेखील सुलुच्या हट्टापुढे ते काही बोलू शकले नाही.

आता बालवाडीच का ? तर हेच खरं संस्कारक्षम वय असते आपण लहान मुलांच्या शिक्षणाचा पाया भक्कम करायचा उभ्या आयुष्याभर त्यांना साथ मिळेल अशी संस्कारांची 'कवच कुंडल' त्यांना द्यायची, हा मनाचा पक्का निश्चय करून सुलु नाशिकच्याच स्वामीनारायण मंदिरातल्या बालवाडी शिक्षिका उषाताई दाणीबाईंना भेटली.दाणीबाई शिक्षण देण्यात तज्ञ होत्या त्यांनी मोठ्या प्रेमाने आणि बारकाव्यानिशी बालवाडी कशी चालवायची, मुलांना गोष्टी कशा सांगायच्या, कविता कशा पाठ करून घ्यायच्या याचे शिक्षण सुलुला दिले. बालवाडीसाठी योग्य ते शिक्षण पूर्ण झाले आता बालवाडी सुरू तर करायचीच हा ठाम निर्णय तर झालाच होता. आणि हा निर्णय तिने सहस्रबुद्धे बाईंना देखील बोलून दाखविला. पण बालवाडीसाठी जागेचा मोठा प्रश्न आहे असे म्हणताच सहस्रबुद्धे बाईंनी हा प्रश्न देखील लगेच सोडवला. तू तुझी बालवाडी माझ्या घरात सुरू कर .....जागेचा प्रश्न सुटला. आता पुढचा प्रश्न होता बालवाडीसाठी मुलं कशी गोळा करायची ? आपल्या ह्या मैत्रिणीला बरोबर घेऊन ती घरोघर फिरली आणि सुरुवातीला दोघींनी मिळून वीस - पंचवीस मुलं एकत्र करून बालवाडी सुरू केली. ते वर्ष होतं १९६८ मुलांना शाळेची प्रवेश फी एक रुपया व महिन्याची फी दोन रुपये अशी ठेवण्यात आली होती .आलेले पैसे दोघी सारखे वाटून घेत होत्या. कमाई ती किती! पण अभिमान होता ,आनंद होता तो स्वकष्टार्जित कमाईचा आणि समाधान होत ज्ञान देण्याच्या पुण्याईचे .पण थोड्याच दिवसात बालवाडी ची सर्व जबाबदारी एकट्या सुलू वर आली. वास्तविक मावशी त्यावेळी 23 वर्षाची होती ,तारुण्यातले फुलपंखी दिवस पण तीचं स्वप्नपंख वेगळ्याच दिशेने उडत होते.निर्धारित मनाने आपल्या खांद्यांवर एक नवीन जबाबदारी घेऊन सुलू मावशीच्या नवीन आयुष्याची वाटचाल सुरू झाली.

छोट्याशा जागेत भरणारी ही बालवाडी एका 'जिद्दी स्त्री ची कर्म कहाणी'. मुलांचा सर्वांगीण विकास करण्यात तसुभरही कमतरता नव्हती ,होती ती तळमळ त्याच्या जोडीला करारी बाणा ,शिस्तशीर पणा , टापटीप, स्वच्छता, मुलांसाठी भरपूर खेळणी, शैक्षणिक विविध प्रकारची सामुग्री, आखीव रेखीव अभ्यासक्रम ,यामुळे मुलांबरोबर पालकही खुश असत . कोणत्याही जाहिरात माध्यमाची साथ न घेता बालवाडी प्रसिद्ध झाली. मुलांची संख्या अगदी झपाट्याने वाढू लागली . आता आपल्या स्वतःच्या जागेत स्वतंत्र बालवाडी सुरू करावी या निश्चयाने बँकेकडून कर्ज घेऊन त्यातुन बालवाडी सुरू केली. खरंतर त्याकाळी बँकेची कर्ज घेणे हे आजच्या प्रमाणे सरळ आणि सोपे नव्हते. त्यासाठी बऱ्याच वेळेस होणारे बँकेचे सर्वे,बँकेत जाऊन स्वतः कागदांची पूर्तता करणे , अतीशय जटिल कार्यवाही होती. त्यावेळी बँकेच्या कर्मचाऱ्यांनी तसेच सुलुच्या मोठ्या बहिणीने व भावाने



तिला बरीच मदत केली आणि बँकेचे कर्ज मिळाले.

' गीतांजली 'बाल मंदिर' हे नाव नवीन हॉलवर झळकू लागले .आता बालवाडीत तब्बल ८० मुले होती .सकाळी ८ते ११ आणि दुपारी १२ते३ अश्या दोन सत्रात बालवाडी सुरू झाली. झाडलोट करणे, पाणी भरणे ,लहान मुलांची शि_शु झाली तर त्यांना बघणे यासाठी एक स्वतंत्र बाई नेमून, बाकी दोन्ही सत्रामध्ये एकटी सुलु मावशी मुलांना शिकवत असे, सांभाळत असे. कधीकाळी कामावरची बाई आली नाही तर ती सगळी कामे देखील स्वतः करायची कधीही दुसऱ्यांवरती अवलंबून राहून, ती कधी थांबलीच नाही. तिच्या कष्टाला सीमा नव्हती आणि समाधानाला मर्यादाही नव्हती, होती ती एकच तळमळ आणि ती म्हणजे ,आपली ही बालवाडी एक 'आदर्श बालवाडी 'म्हणून नावारूपाला आणायची.

मुलांवर उत्तम संस्कार आणि शिक्षण हे उद्दिष्ट असल्यामुळे सर्व सणवार साग्रसंगित साजरे होत. मुलांची दहीहंडी जन्माष्टमीच्या दिवशी खूप मोठ्या प्रमाणात साजरी होत असे आणि त्याचबरोबर मुलांच्या मातांसाठी श्रावण महिन्यातील शुक्रवारचे हळदीकुंकू देखील केले जात असे.

बालवाडीचा वार्षिक समारंभ म्हणजे तर एक मोठी पर्वणीच असायची. वार्षिक समारंभाचा खूप खर्च व्हायचा पण त्याचा बोझ पालकांन वर पडत नसे, त्यामुळे पालकही खुश होत व कार्यक्रमाचा खूप गाजावाजा व्हायचा .अतिशय धुमधडाक्यात आणि थाटात हा समारंभ साजरा केला जायचा .नाशिकच्या प्रसिद्ध कालिदास मंदिरात सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय यशस्वीरित्या पार पडायचा .सांस्कृतिक कार्यक्रम बसवण्यापासून अगदी दणक्यात पार पडेपर्यंत कुंदाताई महाबळ आणि कुटुंबातील सर्वांचे सहकार्य मिळायचे. कुंदाताई महाबळ हे एक उत्साही व्यक्तिमत्व रामायण ,महाभारत, कृष्ण लीला, पर्यावरण यावर अनेक कार्यक्रम बसवले जात. आजच्या काळातील लाखोंची फी घेणाऱ्या शाळांच्या वार्षिक समारंभाला मागे टाकणारी सांस्कृतिक प्रस्तुती होत असे .मुख्य म्हणजे मुलांना लागणारे ड्रेस स्वतः सुलु मावशी शिवणकाम करून कलाकारी करून तयार करत असे, मग ती परीराणी असो वा ससुल्या चा ड्रेस असो. ह्या मधून देखील ती आपल्या कलाकुसरीची हौस पूर्ण करत असे . वार्षिक समारंभा बरोबरच दरवर्षी एक वार्षिक सहलीचेही आयोजन होत असे. त्यातही ती स्वतः जातीने सहभागी होत असे. तीचा पाठांतरावर जास्त भर होता त्यामुळे मुलांचे गोष्टी ,कविता, पाढे अगदी तोंडपाठ असत .त्यामुळे गंमत अशी की माजी विद्यार्थी देखील स्वतःच्या मुलांना घेऊन सुलुबाईंन जवळ येत ,आणि बाई आमच्यावर केलेत तसेच संस्कार आणि शिक्षण आमच्या मुलांना द्या असे आवर्जून सांगत.कारण प्रथम गुरू म्हणजे 'भूतकाळातील दुवा आणि भविष्यकाळाचा दिवा असतो 'हे त्यांना कळलं होत.ही सुलू च्या यशाची मिळालेली एक मोठी पावतीच म्हणायला हवी.

स्वामी विवेकानंदांनी कर्मयोगात म्हटले आहे विद्यादान हे अन्नदानापेक्षा ,प्राण दानापेक्षा श्रेष्ठ आहे. कारण हे 'ज्ञानच माणसाचे खरे जीवन होय' . अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाची सुरुवात सुलूबाईंनी अश्याच विचारांनी केली .आजही तिचे माजी विद्यार्थी उच्चपदस्थ व्यक्ती असूनही तिच्यापुढे नम्रतेने झुकतात आणि त्यावेळी सुलु मावशीच्या चेहऱ्यावरून अलौकिक असा अभिमान ओसांडून वाहत असतो, तो अगदी बघण्यासारखा असतो .

'शरीराने अपंग असले तरी मनाने अपंग राहू नका 'हे संस्कार नकळत तिच्या विद्यार्थ्यांवर घडतात हे महत्त्वाचे नाही का ! अपंगत्व हा केवढा मोठा शाप, त्याचं भांडवल करून सुलु मावशीला इतरांच्या सहानुभूतीचा विषय होता आले असते. पण तिचा स्वाभिमानी स्वभाव, शिक्षणावरची नितांत निष्ठा ,मुलांना संस्कार करण्याचा ध्यास आणि मुख्य म्हणजे आत्मसन्मान इतका प्रचंड होता की या वाटचालीत ज्या ज्या अडचणी आल्या, त्यावर मात करून खंबीरपणाने तिने आपली 'गीतांजली' बाल मंदिर सुरूच ठेवले. आई-वडिलांचे छत्र हरवल्यानंतर तिने स्वतःला आणि भावांना धीर देऊन ,भावांच्या संसारात प्रत्येकाच्या सोयीप्रमाणे स्वतःला न डगमगता ढाळून घेतलं .अडीअडचणींना भावांच्या पाठीशी कायम उभी राहिली. घरकामात देखील ती तरबेजच होती .भाजी निवडणे ,धान्य निवडणे, मुख्य म्हणजे अगदी मऊ खमंग अशा पोळ्या करणे अशी काम ती सांभाळून घेत. घरातील सगळ्यांना तिच्यात काही कमी आहे असे कधी भासलेच नाही.

आम्हा धडधाकटांनाही स्वतःची दोन मुले सांभाळायची तर जीव मेटाकुटीला येतो .शिक्षणाबरोबर मुलांना संस्कारीत करणे तर अगदी अशक्य होऊन जाते .जे तिने अगदी सहज हस्तगत करून घेतले होते. दोन सत्रांमध्ये 40- 40 मुले कशी सांभाळत असेल ? याचे उत्तर एकच ते म्हणजे तिचे हे काम तिच्या आंतरिक तळमळीतून निर्माण झालेले होते .दिवसाच्या आठ ते दहा तासाच्या शाळेनंतर देखील शांत न राहता सुलु मावशी इतर ठिकाणी अभ्यासात मागे पडणारी मुलं शिकवणीसाठी घेत असे आणि त्यांचाही अभ्यास ती तेवढ्याच जोमाने घेत.

सुलु मावशीला तीच्या या कार्याबद्दल बऱ्याच ठिकाणी गौरवण्यात आले होते .मायको एम्प्लॉईज फोरम मध्ये ज्योती कलश कार्यक्रमात ,तसेच वेध न्यूज वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात उल्लेखनीय कार्य करणारे व्यक्तिमत्व म्हणून गौरवण्यात आले होते. त्याचबरोबर लोकमत आणि टकले नगरच्या कला क्रीडा व साहित्य मंडळाच्या वतीने सामाजिक क्षेत्रातील अतुलनीय कार्याबद्दल 'लोकमत पंचवटी रत्न 'हा पुरस्कार दिला गेला होता. आघाडी महिला पुरस्कार आणि नाशिक आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन तिला गौरवान्वित केले गेले होते.

मी हे करणारच या जिद्दी वरती ती रोज नव्याने उभी राहत असे आणि हे बघून लगेच हेलन केलर प्रमाणेच सुलू मावशीनेही जीवन हे एक आव्हान म्हणून स्वीकारले आहे याची खात्री पटते. सहाजिकच मनात आदरभाव जागृत होतो .

आज ८० च्या घरात असलेली मावशी तिचे हे विद्यादानाचे कार्य भाचे सुनेकडे सोपवून आपले उर्वरित आयुष्य कृष्ण मंदिराची दिवसातून चार तासाची सेवा करण्यात घालवते. दुपारी मंदिरात भजनी मंडळात अगदी तल्लीन होऊन हरे कृष्ण.... हरे कृष्ण.... चा जप करीत असते . आजही तीच्या एका वेगळ्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाची ओळख सगळ्यांना होते.

स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी पायांमध्ये हवे ते बळ नाही हे लक्षात येताच ,आपल्या ध्येयपूर्तीसाठी स्वतःच स्वप्नांचे पंखल्यालेली माझी ही 'स्वप्नपंखी' मावशी माझ्यासाठी नेहमीच नक्की एक प्रेरणा असणार.

**संकलन व लेखन :**
**सौ. माधुरी नंदन कुलकर्णी**

# चांगल्या कर्मात देव असतो




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**दैनंदिन जीवनात आपण आपलं प्रत्येक कर्म करताना योग्य काळजी दक्षता घेतली सतर्क असलोत तर आपल्या मुळे इतर कोणालाही कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही.आपला कोणालाही त्रास होऊ नये हेच सगळ्यात उत्कृष्ट कर्म आहे. सत्कर्म , सत्यनिष्ठ आचरण, कर्मात देवत्व निर्माण केले तर इतरत्र जगाच्या पाठीवर कुठेही आपल्याला देव शोधण्याची गरज भासणार नाही. देव शोधण्याची प्रत्येकाची पद्धत हि वेगळी असली तरीही देवाचा शोध नाही असं फार कोणी सापडणार नाही.**

सृष्टी वर देव आहे नाही हे माहित नाही पण चांगल्या कर्मात देव नक्कीच आहे .म्हणून चांगलं कर्म करा देव शोधण्याची गरज पडणार नाही.देव आहे कि नाही मग आहे तर कुठं आहे नाही तर कसा नाही .असं व्यक्तिपरत्वे अनेक मतमतांतरे आहेत.पण आपण दैनंदिन नित्य जे कर्म करतोय हे कर्म जर सात्विक, सत्यनिष्ठ, आणि इतर कोणत्याही जीवला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही असं असेल तर त्या कर्मा मध्ये ईशवाराच रूप आहे. आपण आपल्या कर्मा मध्ये ईशवाराच रूप शोधण्याऐवजी इतरत्र ठिकाणी भटकंती करतो. तुज आहे तुज पाशी परी तु जागा चुकलाशी अशीच आपली कहिशी अवस्था होते.देव शोधुन सापडायला तो काही बाजारातील वस्तू नाही. की आपण बाजारात गेलो पैसे दिले आणि देव खरेदी केला असं कल्पनेत सुद्धा शक्य नाही. मुळात आपण कोणतीही बाब गोष्ट समजून किती व्यवस्थित घेतोय त्यानुसार त्याचा अंतिम अर्थ निष्कर्ष आपल्याला सापडतो . मुळात देवाच्या अस्तित्वाचा प्रश्न सोडवत बसण्या ऐवजी अथवा इतरत्र देवाचा शोध घेत बसण्या ऐवजी आपलं कर्म असं करा कि आपल्याला देव कुठेही शोधण्याची आवश्यकता भासली नाही पाहिजे. धर्म पंथ तत्त्व तत्त्वज्ञान हे कोणतंही असलं तरी ते ईश्वरीय शक्तिच्या परिघातच फिरत .मुळ ज्ञान तत्वज्ञान आपण बगल देऊन आपल्या सोयीनुसार वापरतो . इथंच खरा छेद मिळतो . धर्म संस्कार संस्कृती शास्त्र हे सत्यनिष्ठच असतात.पण आपल्याला त्याचा योग्य अर्थ सापडत नाही.महणुन आपण चुकीचा अर्थ घेऊन योग्य मार्ग शोधतो . म्हणजे



आपला शोध आणि बोध किती कल्पनिय आहे. दैनंदिन आपण अनेक कर्म करतो अथवा ती आपल्याला दैनंदिन जीवन व्यथित करण्यासाठी करावीच लागतात कर्म कोणालाही चुकतं नाही मग हेच कर्म करताना आपण जो मार्ग अंवलबतो तो मार्ग महत्वाचा असतो . मुळात हा मार्ग जर योग्य सापडला शोधता आला तर आपल्या सगळ्या अडचणी समस्या संपुष्टात येतात आणि मार्ग चुकला तर दिशा चुकते आणि आपण भटकंती करतो .हिच भटकंती आपल्याला अनेक ठिकाणी घेऊन जाते . मुळात कर्मात देव आहे हे सुरवातीला समजलं तर पुढील भटकंती होणार नाही.आपण सुरवातीला समजुन घेत नाहीत म्हणून शेवटपर्यंत आपल्याला भटकत राहव लागत सुरुवात चुकली तर शेवट बरोबर कसा येईल म्हणून विचार पुर्वक कर्म केले तर आपल्याला काहिच अडचण उद्‌भवत नाही अथवा इतरत्र कुठेही देव शोधत बसण्याची आवश्यकता नाही. पण अस न करता आपण इतरांच अनुकरण करण्याचा प्रयत्न करतो इतरांच अनुकरण मग ते कसं आहे कोणत्या मार्गवर आहे ते सत्यनिष्ठ आहे कि असत्य आहे हे तपासण्याची तसदी सुद्धा आपण घेत नाही.मुळात मानव हा अनुकरणीय असल्याने आपण आपल्या स्वतःच्या विश्वासावर ठाम न राहता इतरांच कर्म पाहुण अनुकरण करतो. .आणि तेही जास्तीत जास्त वाईट कर्म तर खुप लवकर अनुकरण करतो .चांगलं कर्म सात्विक कर्म हे थोडस कठिण जात म्हणून आपण त्या कडे जास्ती जास्त दुर्लक्ष करतो आणि वाईट कर्मा कडे आकर्षित होतो . आणि मग क्षमायचना करण्यासाठी पुन्हा मंदिर शोधतो .देवा समोर क्षमायाचना करतो . काही प्रमाणात आपण देवाला सुद्धा प्रलोभन देण्याचा यशस्वी प्रयत्न करतो .आणि खोटं खोटं क्षणिक समाधान शोधतो .या सगळ्या घडामोडी भोवती आपलं सगळं आयुष्य चक्र फिरत राहतं . मुळात कर्म सात्विक सत्यनिष्ठ करा आपल्या कार्यात देवत्व निर्माण होईल.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।




## श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977




# शबाना शेख यांना सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख राष्ट्रीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सावित्रीबाई फुले फाउंडेशन पुणे महाराष्ट्र तर्फे प्रतीवर्षी प्रमाणे या वर्षीचा सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख राष्ट्रीय सन्मान पुरस्कार यावेळी विधवा प्रथेवर जनजागृती करून सरकारला जुन्या प्रथेविरुद्ध कायदा करायला लावणाऱ्या आदरणीय प्रमोद झिंगाडे यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला यावेळी सामाजिक क्षेत्रात देश विदेशातील अनेक महिलांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला त्यामध्ये सिंगापूर येथून आलेल्या अनुसया साहू , औरंगाबाद येथील शबाना शेख , उत्तरप्रदेश येथील अंध प्राध्यापिका डॉ चंदा सागर, पुणे येथील पुनम बरके, ओडिसा येथील विदेशिनी पटेल यांनी आपले विचार व्यक्त केले प्रमुख पाहुणे आदरणीय प्रमोद झींगाडे यांनी त्यांच्या समोर घडलेल्या विधांच्या घटनांचा घटना क्रम आपल्या भाषणात उलगडला महात्मा फुलेंचे सातवे वंशज माननीय जे गेली सतरा वर्षे भिडे वाडा राष्ट्रीय स्मारक व्हावे यासाठी लढा देतात ते आमचे मित्र प्रशांत फुले यांनी जेथे मुलींच्या साठी शाळा सुरू झाली तीच बंद आहे ज्या महात्म्यांच्या आदर्श जगभर घेतला जातोय त्यांनी जेथे मुलींच्या साठी शाळा चालू केली तो भिडे वाडा राष्ट्रीय स्मारक म्हणून जाहीर करावा अशी मागणी केली वडगाव शेरी येथील नगरसेवक योगेश मुळीक यांनी महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देऊन सर्व महिलांचे स्वागत केले त्यांच्या कार्याची प्रशंसा केली योगेश मुळीक आणि श्वेता गलांडे यांचे हस्ते गरजू महिलांना साडी वाटप करण्यात आले अध्यक्षीय भाषणात डॉ लालासाहेब गायकवाड यांनी सर्व समाजसेवक यांचे कौतुक करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या डॉक्टरांनी गेल्या चाळीस वर्षात केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला त्यात डॉक्टरांनी घेतलेली चारशे वैद्यकीय शिबिरे, भूकंप ग्रस्त भागात वैद्यकीय मदत, महाड रत्नागिरी इस्लामपूर चिपळूण कोल्हापूर सांगली सातारा जिल्ह्यातील महापूर आला असताना केलेली वैद्यकीय मदत आणि सध्या डॉ. गणेश राख यांच्या बेटी बचाव जन आंदोलन देश विदेशात करीत असलेल्या कार्याचा आढावा घेतला आज रोजी बेटी बचाव जन आंदोलन मध्ये चार लाख डॉक्टर्स तेरा हजार सामाजिक संस्था आणि पंचवीस लाख स्वयंसेवक पूर्ण जगभर मुलींच्या जन्माचे स्वागत करीत आहेत स्त्री भ्रूण हत्या करू नका मुलीला जन्म द्या तिला सन्मान द्या मुलींचं घटत चाललेले प्रमाण वाढवूया इसलिय हम कहते है बेटी है तो कल है बेटी नही है पितापे बोज बदलनी होगी पुरातन सोच कार्यक्रमाचे आयोजन सावित्रीबाई फुले फाउंडेशनच्या सौ. हेमा मस्के यांनी केले तर फाऊडेशनचे मार्गदर्शक जेष्ठ पत्रकार माननीय प्रसून लतांत आणि सामाजिक कार्यकर्ते सचिन नऱ्हे यांनी सूत्रसंचालन केले. सर्व पत्रकार, उपस्थित महिला, सामाजिक कार्यकर्ते, सर्वांचे आणि गेले अनेक दिवस अहोरात्र झटून ज्यांनी कार्यक्रम यशस्वी केला त्या सर्व ज्ञात अज्ञात सर्वांचे आभार मानून आजचा सोहळा पार पडला.

# तरुणांनी चळवळीमध्ये सक्रिय होणे गरजेचे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**आंबेडकरवादी चळवळ ही स्वसन्मान, प्रामाणिकता व त्याग निर्माण करून स्वातंत्र्य समता बंधुता न्याय यावर आधारित समाज रचना निर्माण करते. आंबेडकरी चळवळ ही सामाजिक न्यायासाठी लढणारी एकमेव चळवळ आहे. इतर काही चळवळी ह्या जाती धर्माचे मुद्दे घेऊन काम करतात परंतु देशात एकमेव आंबेडकरी चळवळ अशी आहे जी जाती धर्माचा विचार न करता मानव कल्याणासाठी व सामाजिक न्यायासाठी तयार असते. मग आसिफा प्रकरण असो, कोपर्डी प्रकरण असो, नितीन आगेचे जवखेड प्रकरण, यादव बाईचे पुणे प्रकरणाचा निषेध करून सामाजिक न्यायासाठी आंबेडकरी चळवळ रस्त्यावर उतरताना दिसत आहे.**

मुंबई विद्यापिठाने आदिवासी बहीनीची केलेली बदनामी असेल, पुस्तकाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, संत तुकाराम महाराज, जिजाऊ ची केलेली बदनामी असेल या विरोधात सर्वात अगोदर आंबेडकरी चळवळ रस्त्यावर आल्या तेव्हा कुठे हे सर्वांना माहिती झाले हे वास्तविक कोणी नाकारू शकत नाही. आज आंबेडकरी चळवळ जिवंत ठेवण्याचे काम वयोवृद्ध लोकांनी केले आहे. आजही वयोवृद्ध लोकांना चळवळी विषयी आपुलकी आहे ती युवा वर्गात पाहिजे तशी दिसत नाही हि शोकांतिका आहे. याचा अर्थ युवा वर्ग आंबेडकरी चळवळीपासून दूर गेला असे नाही युवा आजही चळवळीशी एकनिष्ठ आहे पण हि संख्या कमी आहे. आंबेडकरी चळवळीमध्ये युवकांची संख्या कमी असल्याने चळवळ पाहिजे तशी न वाढता ती मागे जात आहे. आज प्रत्येक जन चळवळ मागे जाण्यासाठी प्रस्थापित नेत्यांना कारणीभूत ठरवत आहेत. काही अंशी हे खरे असले तरी प्रभावी उपाय मात्र उपलब्ध सुद्धा आहे. प्रस्थापित नेत्यांनी चळवळीचे तुकडे केले, चळवळीमध्ये पोट भरण्याची सोय करून ठेवली हे सर्वांना माहिती आहे. प्रस्थापितांनी आपल्या नंतर चळवळीला वारस सुद्धा निर्माण केला नाही हेही तेवढेच खरे आहे. चळवळीचा वारस हा आपल्या च घरातील व्यक्ती नसतो. चळवळीचा वारस हा वैचारिक व प्रामाणिक असायला पाहिजे. चळवळीच्या नावाखाली बापाने लाचारी करून आमदारकी मिळवली की स्वतः च्या मुलांना युवा नेता बनवणारे पोटभरू महाभाग चळवळीला कलंक आहेत. चळवळीचे तुकडे जरी झाले असतील तरी चळवळ एक करून पुन्हा उर्जा भरण्याचे काम आजचा युवक करू शकतो. आणि आज तसी परिस्थिती सुद्धा आहे. जनता सुद्धा प्रस्थापितांना कंटाळलेली आहे. यामध्ये युलकांनी एकत्र येऊन समाजाचे नेतृत्व केले तर उत्तम संघटन निर्माण होऊन प्रस्थापितांचे चळवळीचे अस्तित्व नष्ट होण्यास वेळ लागणार नाही. आज प्रस्थापितांनी चळवळ तोडली हेच बोलल्या पेक्षा आजचा युवक चळवळ जोडत आहे असाही सुर समाजातून निर्माण होणे आवश्यक आहे. युवक काही काळ चळवळीशी संबध ठेवतात परंतु रोड्याच दिवसात पाहिजे तसे सक्रिय दिसत नाही याचे कारणही तसे आहे. युवा वर्ग नेतृत्वाला वाव हा त्याच्या ओळखीच्या परिसरामध्ये देण्याचा प्रयत्न करतो. परिसरामध्ये युवा परिचीत असल्याने तेथील वयोवृद्ध लोक म्हणतात कालच पोरगं आम्हाला शिकवणार का ? आमच्या पुढे लहानाच मोठं झालं आणि आज आमच्या च डोक्यावर बसत आहे. असे बोलणे ऐकुन नवीन निर्माण होणारे नेतृत्व हे तेथेच नष्ट होते. म्हणून युवकांनी आपले नेतृत्व आपल्या परिसरात कधीच प्रस्थापित करायचे नाही. आपण कॉलेज, नोकरी, व्यवसाय निमित्ताने बाहेर जातच असतो तेथे आपल्या नेतृत्वाला चालना द्यायची म्हणजे नवीन लोक सुद्धा जोडले जातात आणि नवीन नेतृत्व देखील उभे राहते. नवीन नेतृत्व उभे करणे म्हणजे नवीन एक गट तयार करणे मुळीच नाही. आज पर्यंत जे काही सामाजिक संघटना, नेते आंबेडकरी विचारावर निर्माण झाले आहेत यांचे मतभेद बाजूला ठेवून सामाजिक न्यायासाठी व समाजाच्या कल्याणासाठी एकत्र लढण्याची उर्जा निर्माण होईल असे काम करणे महत्वाचे ठरेल. आणि हे घडवून आणणारा खरा सामाजिक नेता होईल. आज बरेचशे युवक जयंती चे मोठे भव्य दिव्य आयोजन करतात, समाजातून पैसा उभा करतात. मोठमोठ्या लोकांना जमलणार नाही असे नियोजन असते म्हणजे युवकांकडे कौशल्य आहे फक्त ते जयंती पुरते मर्यादित राहते आणि फक्त जयंती साजरी करणे म्हणजे चळवळ नाही तर कोणत्याही माध्यमातून विचार हे घराघरात पोहचवे व त्या विचाराच्या समर्थनात जनमत तयार करणे म्हणजे चळवळ. जयंती म्हणजे फक्त मनोरंजनाचा दिवस म्हणून आपण साजरा करतो. जयंती निमित्त निर्माण झालेले मनुष्यबळ व पैसा चळवळीसाठी खर्च केला तर चळवळ वाढायला नक्कीच मदत



होईल. आज कितीतरी तरुण असे आहेत की ज्यांच्या कडे समाजासाठी करण्याणी क्षमता, ईच्छा आहे पण काही अडचणीमुळे ते त्यांना शक्य होत नाही. म्हणून आपण असे तरुण शोधून त्यांच्या अडचणी दुर करणे सुद्धा महत्त्वाचे आहे. प्रत्येक युवकाने सामाजीक इमानदारीने जर चळलळीला सहकार्य केले तर चळवळ नक्कीच जिवंत होते. सोशल मिडिया च्या माध्यमातून आपण खुप मोठे संघटन उभे करून त्याचा चळवळीसाठी फायदा करू शकतो.फक्त सोशल मिडिया चा वापर चांगल्या पद्धतीने आपण करणे आवश्यक आहे. परंतु आज सोशल मिडिया वर युवक चुकीच्या पोस्ट जास्त शेअर करताना दिसत आहेत. सर्वात महत्वाचे काही काही तरुण पोस्ट वाचतच नाहीत आली की लगेच कॉपी पेस्ट ची घाई असते. यामुळे चुकीचे विचार सुद्धा आपल्या कडून पसरवले जातात.चुकीच्या पोस्ट शेअर होणार नाहीत याची सुद्धा काळजी घेणे महत्वाचे राहते. काही काही तरुण चळवळीकडे नकारात्मक बघतात त्यांना सकारात्मक करण्यात आपला वेळ न घालता सकारात्मक लोकांना जर आपण एकत्र करू शकलो तर नकारात्मक असलेला सकारात्मक होतो. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा चळवळ वाढीची जबाबदारी युवकांवर दिली होती ती जबाबदारी आपण पार पाडणे आवश्यक आहे. अनेक युवक युवती म्हणतात की चळवळीमध्ये काम करण्याची इच्छा आहे पण घरचे नाही म्हणतात काहींसाठी हे खरे तर काहींसाठी ही पळवाट आहे. जे लोक युवकांना किंवा युवतींना चळवळीमध्ये येऊ देत नाहीत त्यांनी जरा विचार करावा शत्रुचे म्हातारे रात्रंदिवस लोकांचे मस्तक भडकवून जातीय दंगली घडवण्यासाठी व संविधान संपवण्यासाठी मेहनत घेतात आपले म्हातारे घरातच राहतात. तुमच्या कडून शक्य नाही तर घरातील तरुण तरूणीला तरी चळवळीत येऊ द्या स्वाभिमानी समाज तयार होईल. आणि जे युवक घरच्या लोकांचे कारण दाखवून चळवळी पासून दुर जातात त्यांच्या साठी एक सांगतो. गुटखा, तंबाखू, दारूचे व्यसन करताना घरचे परवानगी देतात का ? तरी व्यसन करता ना ? प्रेमाच्या नावाखाली व्याभिचार, दिवसभर फोनवर बोलायला घरचे परवानगी देतात का ? तरी पण करता ना ? मग चळवळीमध्ये येण्यासाठी च का घरचे कारणे समोर करता. जो व्यक्ती घरच्या लोकांना समजून सांगु शकत नाही तो व्यक्ती जिवनात काहीच करू शकत नाही. आपण बाबासाहेब आंबेडकर यांना मानतो तर चळवळीमध्ये योगदान देऊन चळवळीला खतपाणी घालून तुकड्या तुकड्यात विभागलेल्या चळवळीला एकत्र करण्यासाठी थोडे झटावे लागणार आहे. आज आपण प्रस्थापित नेत्यांना म्हणतो तुम्ही चळवळीचे तुकडे केले आज आपण काहीच नाही केले तर येणारी पिढी आपल्याला ही असेच म्हणेल ना तुम्ही कोठे जोडण्याचे प्रयत्न केले. मग आपण काय उत्तर देणार. चळवळीच्या माध्यमातून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी तरूण तरुणींनी एकत्र येणे आवश्यक आहे. तरुण एकत्र आले तर चळवळीला नवी पालवी फुटून येणाऱ्या पिढीला समतेची सावली नक्की मिळेल.

# शासकीय कर्मचाऱ्यांचा शेकडोच्या संख्येने मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सलग चौथ्या दिवशीही आंदोलनाचे रौद्ररूप पाहण्यास मिळाले. धुळे जिल्हाधिकारी यांनी कार्यालयास गैरहजर राहणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना कारवाहीची नोटीस ही बजावत असताना तरीही कर्मचाऱ्यांनी अतिशय मोठ्या संख्येने एकजूट होऊन शेकडोच्या संख्येने आंदोलनात सहभाग झाले व सर्व शासकीय नियम शासकीय कर्मचारी या मोर्चात मोठ्याने घोषणा देऊन शहरातील मुख्य भागातून पायी चालत सरकारचा निषेधही करण्यात आला. सर्व कर्मचारी या आंदोलनात शामिल असल्यामुळे अनेक सरकारी कार्यालयात कोंडी होत आहे. लक्षवेधी मोर्चा विविध प्रकारच्या घोषणा देत परिसर दणाणून सोडला होता काहीच तास वाहतुकीचे ही शहरात कोंडी निर्माण असल्याचे दिसून आले वाहतूक कोंडी मुळे सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. या ठिकाणी वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे गर्दीचे नियंत्रण सुटले व वाहतूकदार व आंदोलन यांच्यात भांडणही झालेत.



# डमडम तलावातील बाधित शेतकऱ्यांना तीन महिन्यांच्या आत मोबदला देणार

## ना. तानाजी सावंत यांची विधान परिषदेत घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** गेल्या अनेक वर्षांपासून शिवकालीन असलेले डम डम तलावाच्या जमीन अधिग्रहणाचा मुद्दा हा शेतकऱ्यांची डोकेदुखी बनला होता. यावेळी आम आदमी पार्टीचे युवक आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सतीश लोखंडे यांनी याविषयी सखोल अभ्यास करून विविध स्तरावर निवेदने दिली, जल आंदोलन केले करून शासनाचा लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता व त्याचाच भाग म्हणून मराठवाडा पदवीधर चे आमदार मा. सतीश चव्हाण यांनी सदरील तलावाची दिनांक 5 फेब्रुवारी 2023 रोजी भेट देऊन तलावातील पाण्यामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या होत्या. तसेच बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी अधिवेशनात आवाज उठवणार असल्याचे शेतकऱ्यांना आश्वस्त केले होते. त्यानुसार १५ मार्च रोजी विधान परिषदेत यासंदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले.

133 एकरावरील हा तलाव अतिपावसामुळे पूर्ण क्षमतेने भरल्यास तलावाचे पाणी आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या शेतात साचते. त्यामुळे त्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. शासन तलावातील बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन करावे, व याचा निर्णय आजच जाहीर करावा अशी आग्रही मागणी सतीश चव्हाण यांनी सभागृहात केली. व मुख्यमंत्री महोदयांच्यावतीने माझ्या प्रश्नाला उत्तर देताना सार्वजनिक आरोग्य मंत्री मा.ना.तानाजी सावंत यांनी सदर तलावामुळे बाधित होणाऱ्या क्षेत्राची मोजणी उप अधीक्षक, भूमी अभिलेख, खुलताबाद यांच्या कार्यालयाकडून एका महिन्याच्या आत सर्वेक्षण करून बाधित शेतकऱ्यांना तीन महिन्याच्या आत मोबदला दिला जाईल असे सांगितले. त्यामुळे मागील अनेक वर्षांपासून डमडम तलावातील बाधित शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागला असल्याचे आ. सतीश चव्हाण यांनी सांगितले.



**आम आदमी पार्टीच्या आंदोलनाला यश :** आम आदमी पक्षाने डम डम तलाव पाणी बाधित शेतकऱ्यांसाठी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी, आमदार, खासदार, मुख्यमंत्री, यांना विविध स्तरावर निवेदन दिली प्रसंगी शेकडो शेतकऱ्यांसोबत माता-भगिनींसोबत जल आंदोलनही केले. त्याची दखल घेऊन माननीय सतीश जी चव्हाण साहेबांनी या डमडम तलावास भेट देऊन पाहणी केली होती व आम्हाला आश्वस्त केले होते. आज रोजी सदरील डमडम तलावाची जमीन अधिग्रहण तीन महिन्याच्या आत अधिग्रहित होणार असल्याचे तानाजी सावंत यांनी सांगितले. त्याबद्दल त्यांचे धन्यवाद. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून या शेतकऱ्यांचे जे नुकसान होत आहे त्याचीही नुकसान भरपाई शासनाने द्यायला हवी.

**सतीश देवेंद्र लोखंडे जिल्हा उपाध्यक्ष (युवक आघाडी) आम आदमी पार्टी छ. संभाजीनगर**

# चालकाला डुलकी; ट्रक उड्डाणपुलावरून खाली

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भरधाव ट्रक घेऊन जात असताना चालकाला डुलकी आली आणि ट्रक थेट उड्डाणपुलावरून खाली एका घरावर आदळला. घरातील सदस्य थोडक्यात वाचले. परंतु, ट्रक चालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. हा अपघात बुधवारी रात्री अकरा वाजता धामना येथे घडला. हर्षल युवराज पाटिल (३५, रा. तामसवाडी, ता. साखरी, जि.धुळे) असे मृत चालकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चालक हर्षल पाटील हा ट्रकमध्ये मिरचीची पोते घेऊन नागपूरवरुन जळगावला भरधाव जात होता. धामना उड्डाणपुलावरून जात असताना चालकाला अचानक एक डुलकी आली. त्यामुळे त्याचे ट्रकवरील नियंत्रण सुटले. उड्डाणपुलावरील रोडला लागलेल्या लोखंडी सळाखीला ट्रक घासला आणि थेट पुलाच्या खाली एका कवेलूच्या घरावर आदळला. यात ट्रकमधील वाहन चालक हर्षल पाटील हा जागीच ठार झाला. ज्या घरात ट्रक आदळला. त्यावेळी त्या घरात रमेश महादेव कोल्हे, लिलाबाई महादेव कोल्हे, जितेंद्र राजेंद्र कोल्हे, वैशाली जितेंद्र कोल्हे, वच्छला महादेव कोल्हे (सर्व राहणार धामना) व बहिणीकडे पाहुणी आलेली जयश्री शिंदे (साकोली) हे सहा व्यक्ती गाढ झोपेत होते. अचानक जोराचा आवाज आल्याने सर्व व्यक्ती उठले. तेथे गोंधळ उडाला. रमेश कोल्हे यांनी हिंगणा पोलीसांना फोनवर माहिती दिली. पोलीस तासाभरातच घटनास्थळी दाखल झाले. या घटनेत रमेश कोल्हे यांच्या घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.



# महिलादिननिमित्त शारदा मंदिरच्या मुलींना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्री शारदा मंदिर कन्या प्रशालेमध्ये अतिशय उत्साहत महिला दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून आयुर पंख या वैद्यकीय संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना मासिक पाळी या विषयी डॉ. सुनीता परिहार, पोषक आहार या विषयी डॉ. राजश्री नीलकंठ, डॉ. वृषाली निरवे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात वैद्या मंगल ताठे, सुनीता राठोड, स्नेहल भुजबळ, रीना देशमुख, सुचिता साबळे, शितल वालतुरे सहभागी होत्या. या निमित्ताने विद्यार्थिनी वैभवी तारे, रिद्धी कनकोरीकर, तनिषा मोरे, योगिता तलकोकुलवार, पूनम कोल्हे या मुलींनी प्रतिभाताई पाटील, डॉ. आनंदीबाई जोशी, किरण बेदी, झाशीची राणी लक्ष्मीबाई या सारख्या ऐतिहासिक व्यक्तीरेखा साकारल्या तसेच वेदिका पाथरकर या विद्यार्थिनीने स्वरचित 'बेटी' ही कविता सादर केली. कार्यक्रमाला प्रशालेच्या मुख्याध्यापिका डॉ. सविता मुळे, उपमुख्याध्यापिका वंदना रसाळ, पर्यवेक्षिका अलका भंगाळे, शोभा बोरीकर तसेच प्रशालेच्या ज्येष्ठ शिक्षिका सीमा कुलकर्णी आणि सर्व शिक्षक उपस्थित होते.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि ग्रंथालये MUCLA तर्फे दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा नाशिकला

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** महाराष्ट्रातील उच्चशिक्षण क्षेत्रात कार्यरत विद्यापीठ आणि महाविद्यालयीन ग्रंथपालांचे व्यावसायिक प्रश्न व समस्या तसेच ग्रंथालय क्षेत्रातील बदलत्या घडामोडी व त्याची ओळख आणि ग्रंथालयाचे विकासात्मक मुद्दे एकत्रितरित्या मांडण्यासाठी राज्यस्तरावर Maharashtra University and College Librarians Association (MUCLA) या संघटनेची स्थापना करण्यात आलेली आहे. या संघटनेचे महाराष्ट्रातील विद्यापीठांमधील ग्रंथपाल, महाविद्यालयीन ग्रंथपाल हे सदस्य आहेत. महाराष्ट्र विद्यापीठ व महाविद्यालय ग्रंथपाल संघटना (MUCLA) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सेक्शनल कौन्शील, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "National Education Policy 2020 and Libraries" या विषयावर तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या क्षेत्रातील नवनवीन मुद्द्यावर चर्चा व्हावी यासाठी संघटनेची राष्ट्रीय परिषद ही नाशिक येथे दि. १८ - १९ मार्च २०२३ रोजी श्री राष्ट्रसंत सदगुरू जनार्दन स्वामी आश्रम, औरंगाबाद रोड, तपोवन, नाशिक ४२२००३ येथील सभागृहात आयोजित करण्यात आलेली आहे. या परिषदेसाठी संपूर्ण भारतामधील उच्च शिक्षणक्षेत्रातील ३०० ते ४०० च्या वर विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथपालांची उपस्थिती असणार आहे.

या कार्यशाळे मध्ये संघटने तर्फे महाराष्ट्रामध्ये सर्व विद्यापीठामध्ये सिनेट सदस्या म्हणून निवडून आलेले ग्रंथपाल आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या क्षेत्रातील प्राध्यापक यांचा सत्कार करण्यात येणार आहे तसेच नाशिक, नगर आणि पुणे या क्षेत्रातील निवृत्त झालेले ग्रंथपाल यांचा हि सत्कार करण्यात येणार आहे. तसेच संघटनेतर्फे दिला जाणारा सर्वोत्कृष्ट संशोधन लेख पुरस्कार हा सुद्धा देण्यात येणार आहे. या कार्यशाळेसाठी उद्घाटक म्हणून पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.संजीव सोनवणे सर तसेच समारोप साठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ.प्रफुल्ल पवार सर उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सेक्शनल कौन्शील, पुणे येथील प्रमुख डॉ.संजय देसले, निमंत्रक डॉ संभाजी पाटील संघटन सचिव श्री योगेश मते सह-संयोजक हे काम बघत आहे. तसेच महाराष्ट्र विद्यापीठ व महाविद्यालय ग्रंथपाल संघटनेचे डॉ. मोहन खेरडे- चेअरमन, डॉ. विनय पाटील - सेक्रेटरी डॉ. मधुकर शेवाळे कॉन्फरन्स डायरेक्टर यांचे मोलाचे सहकार्य आहे.

या कार्यशाळे साठी सर्व ग्रंथपाल तसेच इतर मान्यवर मंडळी असे सन्माननीय व्यक्ती उपस्थित राहून सर्वांना दोन दिवस मार्गदर्शन करणार आहेत. त्याचप्रमाणे ह्या दोन दिवसात वेगवेगळे सेशन घेऊन ग्रंथालयशास्त्राशी निगडित वेगवेगळ्या विषयांच्या संदर्भात तसेच ग्रंथालयाशी निगडित किंवा ग्रंथालय शास्त्राशी निगडित नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात काय बदल हवेत ह्यासंबंधीची महत्त्वाची चर्चा घडवून आणणार आहेत. सर्व ग्रंथपालांनी आणि ग्रंथालय शास्त्रातील सर्व घटकांनी ह्या सहाव्या कार्यशाळे साठी नाशिक येथे हजर राहण्याचे आवाहन महाराष्ट्र विद्यापीठ व महाविद्यालय ग्रंथपाल संघटना या संघटनेचे पुणे विभागीय सचिव डॉ.संजय देसले (सहाय्यक ग्रंथपाल, जयकर ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांनी केले आहे.

# संविधान वाचवायचे असेल तर ते आधी वाचले पाहिजे

## मेधा पाटकर : जळगाव जामोद येथे नारी शक्तीचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** संविधानानुसार प्रत्येक व्यक्तीला अन्न मिळाले पाहिजे आदिवासी या देशाचे मूळ रहिवासी आहेत त्यांना जगण्याचा अधिकार आहे परंतु त्यांना कुपोषणाचा सामना करावा लागतो कायद्याने दारूबंदी केली पाहिजे असे म्हटले असले तरी दारूबंदी साठी लढा द्यावा लागतो दारूबंदीसाठी नंदुरबार मधील एका वस्तीत 11 महिलांनी आत्महत्या केल्या तरीही दारूबंदी झाली नाही. त्यामुळे संविधान वाचवायचे असेल तर ते वाचा] असे प्रतिपादन नर्मदा वाचा आंदोलनाच्या प्रणेत्या मेधाताई पाटकर यांनी केले आज दिनांक 12 मार्च रोजी जळगाव जामोद येथे सातपुडा कॅम्पस मधील उमादेवी सभागृहात व्हिडिओ वॉलेंटिअर इंडिया च्या वतीने आयोजित सन्मान नारी शक्तीचा या कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. स्वाती वाकेकर तर मंचावर अंजली टापरे योगिता पहुरकर पुष्पा भोजने नयना मारोडे मीनल दामधर प्रेमलता सोनवणे राजकुमारी चौहान शाहीना पठाण डॉ उज्वला पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना मेघाताई पाटकर म्हणाल्या की सत्तेचे विकेंद्रीकरण खालपासून वरपर्यंत झाले पाहिजे महिला सर्व क्षेत्रात पुढे गेल्यात असे आपण म्हणतो परंतु आजही या देशात लाखो महिला पीडित आहेत कष्ट सहन करत आहेत अन्याय भोगत आहेत 60 टक्के जनता गरीब वस्तीत राहते महिलांचा सन्मान करायचा असेल तर एकाही महिलेला बेघर ठेवता कामा नये श्रमिकांचे 29 कायदे रद्द करण्याचे भांडवलदारांचे षडयंत्र चालले आहे त्यांना कर्ज माफी मिळते मात्र गरिबांना का नाही असाही सवाल त्यांनी निर्माण केला.याप्रसंगी बुलढाणा जिल्ह्यातील वेगवेगळ्या क्षेत्रात कर्तुत्ववान असलेल्या 55 महिलांचा सत्कार मेघाताईंच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक विनोद वानखडे यांनी केले त्यानंतर सर्व मान्यवर महिलांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले तर सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती महिलांनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे संचालन अस्मिता कोकाटे तर आभार प्रदर्शन छाया तायडे यांनी केले यावेळी जळगाव संग्रामपूर तालुक्यातील बचत गट महिला अंगणवाडी सेविका मदतनीस यांच्यासह आदिवासी व इतर महिलांची उपस्थिती होती..

# रेणुका माता मंदिराच्या प्रवेशद्वारांचे काम पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** ( ताः खुलताबाद ) येथील भाविकांचे आराध्य दैवत व कुलदैवत असणाऱ्या श्री रेणुका माता मंदिराच्या दोन प्रवेशद्वारांचे काम पूर्ण झाल्याने मंदिर प्रांगणाच्या वैभ वा मध्ये भर पडणार आहे. या मंदिराचा राज्य शासनाच्या तीर्थक्षेत्र योजनेअंतर्गत समावेश असला तरी येथील समस्त भाविकांनी व दानशूर काही व्यक्तींनी वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ आर्थिक सहाय्य करून सभा मंडप सजावट मंदिराच्या सभोवतालच्या भागात प्रांगणात फेवर ब्लॉक बसवणे ही कामे केल्यानंतर भाविकांच्या सहकार्यातून व लोकवर्गणीतून मुख्य मंदिराचे प्रवेशद्वार व गावाकडून मंदिराकडे प्रवेशद्वार अशा दोन भव्य प्रवेशद्वारांची उभारणी केली आहे. यावर्षी येणाऱ्या चैत्र शुद्ध पौर्णिमेच्या वार्षिक यात्रा महोत्सवापूर्वी रंगरंगोटी व सजावटीचे काम भाविक भक्तांची समिती तसेच मंदिर समिती सदस्य यांच्या समन्वयातून गावाच्या मुख्य दैवताचा पर्यटन व भाविकांच्या देवदर्शनासाठी सोयी सुविधांचा विचार करता सहकार्यातून देवस्थानचा विकासात्मक उपक्रम राबवीत असल्याने दररोजच येथील देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी नेहमी होत आहे परिसर नेहमीच गजबजलेला असतो कायमस्वरूपी पूजा साहित्याची विक्रीची दुकाने फाटलेली असतात. शासकीय तीर्थक्षेत्र योजनेअंतर्गत अधिक विकासात्मक कामे झाल्यास हे तीर्थक्षेत्र चांगले प्रसिद्ध होऊ शकते अशी स्थिती आहे.

# डॉ. भागवत कराड विकासनिधीतून सिमेंट रस्त्याचे येसगाव नं. 1 येथे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड विकास निधीतून सिमेंट रस्त्याचे उद्घाटन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री मा.ना श्री.डॉ भागवतजी कराड साहेब यांच्या स्थानिक विकास निधीतून 10 लक्ष रू ( येसगाव नं 1 ) येथे सिमेंट रस्त्याचे उद्घाटन सरपंच जिज्ञासाताई काळे यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, शांताबाई बोबले, लताबाई आव्हाड, योगेश काळे,रामुनाना खंडागळे, शंकर खंडागळे,विजय आव्हाड, विलास आव्हाड,सलमान शेख, विशाल चव्हाण, दिनेश खंडागळे, अब्बु चाऊस, ज्ञानेश्वर बोबले,बाबुराव कायस्थ, दिनेश कायस्थ, इंजिनिअर सागर सावजी तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.





# एमआयएम फुलंब्री शहराध्यक्षपदी गंगावणे तर तालुका उपाध्यक्षपदी आसिफ पटेल

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील वंचित बहुजन आघाडीचे माजी शहराध्यक्ष भगवान गंगावणे यांनी काही दिवसांपूर्वी औरंगाबाद येथे एम आय एम पक्षाचे खासदार तथा प्रदेशाध्यक्ष इम्तीयाज जलील यांच्या उपस्थितीत एम आय एम पक्षात प्रवेश केला होता.

तरुण तडफदार नेते भगवान गंगावणे यांची ए आय एम आय एम पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी दखल घेत त्यांची फुलंब्री शहराध्यक्ष पदी काल दिनांक 15 मार्च रोजी करण्यात आली. तसेच फुलंब्री तालुका उपाध्यक्षपदी आसिफ पटेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सदरील नियुक्ती ए आय एम आय एमचे जिल्हाध्यक्ष समीर साजेद बिल्डर यांच्या आदेशानुसार तालुका अध्यक्ष हाफिज सय्यद रज्जाक यांनी केली आहे. सदरील नियुक्तीचे पत्र फुलंब्री-सिल्लोड पक्ष निरीक्षक बबलूशेठ यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी रणजित वाहूळ, किशोर गंगावणे, बाबासाहेब बहादूर, दिनेश खंडागळे, कलीम शहा, रामेश्वर प्रधान, राहुल दांडगे, विशाल गंगावणे, सुभाष गंगावणे, राहुल उबाळे, सलमान शेख, यश बोर्डे, बाळू गंगावणे, सय्यद जुल्फेखार आदी उपस्थित होते.

# जुनी पेन्शन लागू करा; कर्मचारी बेमुदत संपावर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** राज्य शासकिय कर्मचारी महासंघ, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या समन्व समिती च्या माध्यमातून राज्यभर जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकिय सेवेत सामावलेले आहेत त्यांना न्यायालयात पेंशन स्किम ( एनपीएस ) लागु असुन ही कर्मचारींच्या करीता घातक असल्यामुळे सदर पेंशन बंद करुन जुनी पेंशन योजना मंजुर करावी या करीता बे मुदत काम बंद आद्दोलन करुन राज्यातील सर्व कर्मचारी हे बे मुदत संपावत उतरलेले असुन याचाच एक भाग म्हणून पंचायत समिती खुलताबाद येथील कर्मचारी हे दिनांक १४/०३/२०२३ पासुन जिल्हा परिषद कार्यालयाच्या समोर धरणे धरुन निदर्शने केवी , राज्य समन्वय समिती व जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ यांच्या निर्देशानुसार दिनांक १६/०३/२०२३ पासुन पंचायत समिती स्तरावर बे मुदत संपाचे अनुशंगाने निदर्शने करण्यासाठी जमनार असुन तेथे निदर्शने करणार आहेत, या संपात ग्रामसेवक संघटना, नर्सेस संघटना, आरोग्य सेवक पुरुष संघटना, शाखा अभियंता संघटना, स्थापत्य अभियांत्रिकी संघटना, शिक्षक संघटना, कृषी तांत्रिक संघटना, विस्तार अधिकारी संघटना, लिपिक वर्गिय संघटना, हातपंप संघटना, चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटना, पशु संवर्धन कर्मचारी संघटना, लेखा कर्मचारी संघटना, कनिष्ठ प्रशासन अधिकारी व सहायक प्रशासन अधिकारी संघटनेचे तालुका स्तरावरील कर्मचारी संपात सहभागी होउन निदर्शने केली व जो पर्यंत जुनी पेंशन योजना लागू होत नाही तो पर्यंत पंचायत समिती स्थरावर निदर्शने व बे मुदत संप करण्या बाबत निर्धार करण्यात आला आहे.



# स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले जयंती उत्सव समिती जाहीर

## अध्यक्षपदी विलास पांगारकर, कार्याध्यक्षपदी राजेंद्र दाते पाटील, स्वागताध्यक्षपदी आ. प्रशांत बंब, हर्षवर्धन कराड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** संपूर्ण विश्वाला प्रेरणा दायी असलेल्या कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भोसले कुळाचे मुळगाव म्हणजे छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील वेरुळ हे होय. स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले जयंती महोत्सव १५ ते २५ मार्च असा दहा दिवस साजरा होणार असल्याची माहिती दि.१५ मार्च २०२३ रोजी एका पत्रकार परिषदेत स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले जयंती महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोरभाऊ चव्हाण, राजेंद्र दाते पाटील यांनी दिली. वेरूळ येथील भोसले कुटुंबीयांची साधारणताः१९२ एकर जागा असुन त्यात नियोजीत स्मारका च्या गढी साठी ६ एकर जागेवर नियोजन असुन यातील भोसले कुटुंबाच्या मालकीच्या ३ एकर जागेवर राज्य शासनाचे आरोग्य केंद्र होते तर यातील मालोजीराजे यांनी उत्कृष्ट असे पाणी व्यवस्थापन करून शेतीसाठी, पिण्यासाठी, दुभत्या जनावरां साठी असा एकुण १३३ एकरचा तलाव असुन यातील ५० एकर जागेवर राज्याच्या नगर रचना विभागाने बगीचा निर्माण करण्याचा संकल्प केला आहे परंतु या स्मारकास आंतरराष्ट्रीय दर्जा व स्वरूप प्राप्त व्हावे म्हणुन केंद्र शासनाकडे केंद्रीय अर्थराज्य मंत्री डॉ.भागवत कराड यांचे मार्फत स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले जयंती महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोरभाऊ चव्हाण, राजेंद्र दाते पाटील व सहकाऱ्यांनी केल्यामुळे केंद्र शासनाने पाचं कोटी रुपयांचा निधी या स्मारक प्रकल्पास मंजुर केल्याची घोषणा छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमात केंद्रीय अर्थराज्य मंत्री डॉ.भागवत कराड यांनी जाहीर केलाअसुन या प्रकल्पा साठी पी.एम.सी (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी) सुद्धा नियुक्त झाली असुन देशातील सर्वच महत्वाच्या प्रकल्पांचे नियोजन या अव्वल दर्जाच्या संस्थेने केले असुन त्यांचे कार्यकारी संचालक व्ही पी सिंग व तज्ञ संचालक रेड्डी यांनी प्रकल्पास प्रत्यक्ष भेट दिली आहे.

त्या मुळे या प्रकल्पाच्या कामाचा दर्जा व स्वरूप नक्कीच आंतरराष्ट्रीय दर्जाचे होईल असा विश्वास स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले जयंती महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोरभाऊ चव्हाण, राजेंद्र दाते पाटील आणि समितीने व्यक्त केला असुन या प्रकल्पांसाठी अधिकच्या निधीसाठी सुद्धा पाठपुरावा



समिती करणार आहे.

शहाजीराजे भोसले जयंती महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोरभाऊ चव्हाण यांनी वर्ष २०२३ची नूतन कार्यकारीणी जाहीर केली.

असुन यात अध्यक्ष - विलासभाऊ पांगारकर, स्वागताध्यक्ष -आमदार प्रशांत बंब,हर्षवर्धन कराड कार्याध्यक्ष - जलअभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांची निवड करण्यात आली आहे. कार्यकारीणी मध्ये अनेक मान्यवरांना स्थान देण्यात आले असून उपाध्यक्ष - सुनील कोटकर, धनंजय पाटील, ज्ञानेश्वर अंभोरे,मनोज गायके, गोपाळ चव्हाण, प्रदीप नवले,रोहित पवार,गणेश ढोबळे,अंकत चव्हाण, योगेश औताडे, सरचिटणीस - नितीन कदम, प्रशांत इंगळे, रमेश गायकवाड, विकिराजे पाटील,राहुल बनसोड, नाना कदम, परमेश्वर नलावडे, प्रभाकर मुठ्ठे पाटील,सचिन सरकटे, गणेश लोखंडे, ज्ञानेश्वर गायकवाड, मच्छिंद्र घोरपडे, माधव पाटील, सचिन गायकवाड, निलेश डव्हळे, रामभाऊ जाधव, ज्ञानेश्वर ढोबळे. *सचिव*- अजिंक्य मरकड, अशोक वाघ, अभिषेक जाधव, राजीव थिटे, विधीज्ञ सचिन जाधव, किशोर काळे, योगेश बहादुरे,राजु कदम,विकास बोधक,अशोक मोरे,रविंद्र पवार, पंकज नवले , अजिंक्य चव्हाण, रविंद्र सोनवणे, नितिन कदम, *कोषाध्यक्ष* .- डॉ.उद्धव काळे, योगेश केवारे, अशोक खानापुरे. *महीला समिती* विधिज्ञा सुवर्णा मोहिते,सुकन्या भोसले, प्रा. मनिषा मराठे, अश्विनी पवार, रेखा वाहाटुळे, सुवर्णा तुपे,रेणुका सोमवंशी वैशाली खोपडे, मंजुषा पवार, संगीता जाधव,तनश्री गायकवाड, डॉ.संध्या मोहिते, अनुराधा ठोंबरे, संगीता वाघुले, आशा निकाळजे, हेमा पाटील, कल्पना निकम, लक्ष्मी मस्के, ललिता वल्ले, कल्पना साखळे, कविता पाटील. सल्लागार- प्रा.आर एम दमगीर, प्रा.डॉ.त्रिंबक पाटील, तानाजी हुसेकर, विजय काकडे, प्रा.चंद्रकांत भराट,प्रदीप बिल्लोरे, आणि सर्व सदस्य स्वराज्य संकल्पक शहाजी राजे भोसले स्मारक सल्लागार समिती, महाराष्ट्र शासन आणि विविध सामाजिक संस्था, संघटनेचे अध्यक्ष आहेत.

स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले जयंती महोत्सव समितीचे वतीने ४२९वी जयंती साजरी करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन *उद्घघाटक म्हणून* नागपुर संस्थांन चे श्रीमंत मुधोजीराजे भोसले, राजे लखोजी जाधव सिंदखेड यांचे वंशज शिवाजीराजे जाधव उपस्थीत राहणार असुन *कार्य क्रमाचे अध्यक्ष* म्हणून पालकमंत्री संदीपान भूमरे पाटील हे राहणार असून *प्रमुख पाहुणे* म्हणून केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, राज्य शासनाचे सहकार मंत्री अतुल मोरेश्वर सावे, विरोधी पक्ष नेते विधानपरिषद अंबादास दानवे जेष्ठ नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे यांचे सह आमदार प्रशांत बंब, जेष्ठ उद्योगपती पद्माकर काका मुळे, साहित्यिक बाबा भांड, मुख्य अभियंता पाट बंधारे विजय घोगरे, कैलास जाधव व्यवस्थापकीय संचालक रस्ते विकास महामंडळ मुंबई.

# आजपासून महिलांना बस प्रवासात ५० सवलत लागू

## जि. उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सोयगाव महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसटीमधून प्रवास करणाऱ्या महिलांना प्रवास टिकिट दरात ५० टक्के सवलत देणार असल्याचे जाहीर केले.अखेर या आदेशाचा अध्यादेश निघाला असून आज म्हणजेच दि.१७/३/२३ रोजी पासून एसटी महामंडळाने बसमधून प्रवास करणाऱ्या महिलांना तिकिट दरात ५० टक्के सवलत देणार आहे.एसटी महामंडळाच्या या योजनाला (महिला सन्मान योजना) म्हणून ओळखले जाणार आहे.राज्य शासन एसटी महामंडळाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना 33 ते 100 टक्के पर्यंत प्रवासी तिकीट दरात सवलत देते. यापूर्वी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त राज्य शासनाने 75 वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बसमधून मोफत प्रवासाची सवलत जाहीर केली होती. तसेच 65 ते 75 वर्षाच्या ज्येष्ठांना एसटीच्या बसमधून तिकीट दरात 50 टक्के सवलत देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार या दोन्ही घटकांना एसटीच्या प्रवासी भाड्यात सवलत दिली जाते. या प्रवाशांच्या तिकीट दरातील शुल्क प्रतिपूर्ती महाराष्ट्र सरकार करणार आहे.



एसटी प्रवासातील सवलतीबाबत शासनाने घोषणा 9 मार्चला केली तरी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासन आदेशाची (GR) आवश्यकता असते. शासन आदेशाशिवाय कोणत्याही घोषणेवर अंमलबजावणी होत नाही. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व महिलांना एसटी महामंडळामधे सरसकट 50 टक्के तिकीट दरामधे सवलत जाहीर केली. परंतु, या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी जीआर निघाला नव्हता. परंतु आता अध्यादेश जारी करण्यात आला आहे.अशी माहिती भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी बोलताना सांगितले.

# सोयगाव येथे जुन्या पेन्शनसाठी सरकारी कर्मचाऱ्यांना पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथील आपल्या सोयगाव तालुक्यातील प्राथमिक शाळेचे शिक्षक, शिक्षीका ताई, शासकीय निमशासकीय कर्मचारी यांना जुनी योजना लागू करण्यात यावी कारण, 2005, पासुन नविन शिक्षक शिक्षीका ताई कर्मचारी नौकरी लागलेल्या कर्मचारी यांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळणार नाही करिता शिक्षक वर्ग म्हणजे गुरूचा दर्जा आहे आणि त्यांनाच पेन्शन योजना लागू नाही, त्याना निवडणुकीपासून ते गावातील जनतेची माहिती द्यावी लागते नविन मतदार नोंदणी, असे अनेक छोटे मोठे कामे, त्यानाच करावे लागतात त्यांना जुनी पेन्शन लागू करण्यात आली पाहिजेत तसेच शिवसेनेचे पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री आदरणीय, श्री, उद्धवजी बाळासाहेब ठाकरे, साहेब यांनी आपणास पाठींबा दिलेला आहे, आमचें मराठवाड्याचे शिवसेना नेते माजी खासदार सन्माननीय चंद्रकांतजी खैरे साहेब यांच्या प्रमुख आदेशानुसार, व, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते तथा जिल्हा प्रमुख सन्माननीय अंबादासजी दानवे साहेब, व सन्माननीय जिल्हा प्रमुख ग्रामिण राजु भाऊ राठोड, सन्माननीय आमदार उदयसिंग राजपूत साहेब यांच्या आदेशानुसार, आज दिनांक १६ मार्च उपोषणाचा तिसरा दिवस असताना आपणास सोयगाव तालुका शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका प्रमुख,, दिलीप मचे व आमचें तालुक्यातील शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आपणास जाहीर पाठिंबा देत आहे, असे बोलतांना उध्दव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका प्रमुख दिलीप मचे यांनी बोलताना सांगितले.

# जतमध्ये भाजपच्या माजी नगरसेवकाची हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**जत/ सांगली :** सांगलीतील जत तालूक्यातील भाजपचे माजी



नगरसेवक विजय ताड यांचा आज काही अज्ञातांनी पाठलाग करून गोळ्या घालून हत्या केली. आज दुपारी विजय ताड हे मुलांना शाळेतून घरी आणायला गेल्यावर सांगोला रस्त्यावरील अल्फोन्सा इंग्लिश स्कूल जवळ ही घटना घडली. विजय ताड हे जत नगरपरिषदेचे भाजपचे माजी नगरसेवक होते. आज दुपारी ते मुलांना शाळेतून आणावयास आपल्या इन्होव्हा गाडीतून चालले असताना अज्ञातांनी त्यांचा पाठलाग करून त्यांची गाडी अडवली. हल्लेखोरांनी हल्ला केला असता विजय ताड हे गाडीतून उतरून पळत असताना हल्लेखोरांनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या हल्लेखोर येवढ्यावरच न थांबता विजय ताड यांना दगडाने ठेचून त्यांचा निर्घून खून केला.

जत शहरात विजय ताड यांच्या खुनाची बातमी पसरताच ताड समर्थक व लोकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. पोलीसही घटनास्थळी तात्काळ हजर झाले. विजय ताड यांच्यावरील हल्ल्याचे नेमके कारण स्पष्ट झाले नसून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# कूलर वापरताना विद्युत सुरक्षेची काळजी घ्या; बिदे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात तापमान वाढल्याने कुलरचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे. मात्र खबरदारी न घेतल्याने अपघाताची शक्यता असते. त्यासाठी नागरिकांनी कुलर वापरताना विद्युत सुरक्षेची खबरदारी घ्यावी, असे सोयगाव तालुक्यातचे उपकार्यकारी अभियंता निरज बिदे यांनी आवाहन केले आहे. कुलरसाठी नेहमी पिन प्लगचा वापर करावा. कुलरमध्ये पाणी भरण्यापूर्वी कुलरचा वीजपुरवठा बंद करून प्लग काढून ठेवावा म्हणजे कुलरचा विजेशी काहीही संबंध राहणार नाही.. पाणी भरताना ते टाकीच्या खाली सांडून बाजूला जमिनीवर पसरणार नाही, याची खबरदारी घ्यावी. पाणी भरल्यानंतर प्लग पिन लावून स्विच चालू करावे. त्यानंतर कुलरच्या कुठल्याही भागाला स्पर्श करू नये. कुलरचे कनेक्शन व वायरिंग अधिकृत कारागिराकडून तपासून घ्यावे. अर्थिंगची तपासणी करून घ्यावी. अथिंग व्यवस्थित असल्यास लिकेज करंट येत नाही. कुलरच्या आतील वायर पाण्यामध्ये बुडणार नाही याची काळजी घ्यावी... पंपातून पाणी येत असल्यास वीजपुरवठा बंद करून नंतरच कुलरला हात लावावा. ओल्या हातांनी कुलरला कधीही स्पर्श करू नये. लहान मुलांना नेहमी कुलर पासून सुरक्षित अंतरावर ठेवावे आणि ती कुलरजवळ खेळणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी.कुलरच्या लोखंडी बाह्याभागात वीजप्रवाह उतरु नये यासाठी कुलरचा थेट जमिनीशी संपर्क येईल, अशी व्यवस्था करावी; जेणेकरून कुलरच्या लोखंडी बाह्यभागात वीजप्रवाह उतरल्यास त्याचा धक्का बसणार नाही. कुलरमधील पाण्याचा



पंप ५ मिनिटे सुरू आणि १० मिनिटे बंद ठेवणाऱ्या इलेक्ट्रिक सर्किटचा वापर करावा. यामुळे विजेचीही मोठ्या प्रमाणावर बचत शक्य आहे. कुलरबाबत माहिती नसल्यास कनेक्शन बदल करू नये. कुलरची दुरुस्ती चालू अवस्थेत न करता प्लग काढून नंतरच काम करावे. कुलरच्या प्लगला जोडलेली वायर खंडित वा जीर्ण झालेली असल्यास बदलून दुसरी लावण्यात यावी. अनेकदा पाण्याची पातळी खोल गेल्याने पंप सुरू करूनही पाणी खेचले जात नाही व तो पंप एअर लॉक होतो. अशावेळी प्रायमिंग करणे आवश्यक असते. मात्र चालू पंपाचे प्रायमिंग करणे टाळावे. कुलर हलवताना प्लग पिन काढून नंतरच त्याची हालचाल करावी. कुलर पंप अधूनमधून बंद करावा. दैनंदिन व्यापातून थोडासा वेळ या उपाययोजनांसाठी दिला तर कुलरमुळे होणारे विद्युत अपघात टळू शकतात.अशी माहिती निरज बिदे उपकार्यकारी अभियंता महावितरण कार्यालय सोयगाव यांनी बोलताना सांगितले.

# एसटीत सवलतीच्या निर्णयामुळे टॅक्सी, रिक्षाचालक देशोधडीला

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** राष्ट्रपती, प्रधानमंत्री, केंद्रीय परिवहनमंत्री , राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री, सभापती, विरोधीपक्षनेते यांच्यासह तहसीलदार राज्य सरकारच्या परिवहन महामंडळाच्या बस गाड्यामध्ये 75 वर्षावरील नागरिकांना मोफत प्रवास व महिलांना 50% प्रवासात सवलत या निर्णयामुळे राज्यातील टॅक्सी (काळी पिवळी), रिक्षाचालक यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्य सरकारने या वाहनधारकांचा व त्यांच्या कुटुंबाचा विचार न करता निर्णय घेतल्याने राज्यातील अनेक कुटुंब उध्वस्त होणार आहे. या निर्णयाचा फेरविचार करण्यासह विविध मागण्या संदर्भात मराठवाडा टॅक्सी युनियन चे तालुकाध्यक्ष दिलीप शिंदे यांनी दि.१७ शुक्रवारी नायब तहसीलदार गोरखनाथ सुरे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी, राज्य सरकारने 75 वर्षावरील नागरिकांना बसमध्ये मोफत प्रवास व महिलांना बस भाड्यात 50% सवलत यामुळे प्रवासी वाहतूक करणारे टॅक्सी,रिक्षाचालक यांच्या हाताचा रोजगार हिरावला जाणार असल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह,मुलांचे शिक्षण, बँक कर्ज गटाचे कर्जाचे हप्ते भरणे कठीण होणार आहे. सरकारच्या या निर्णयाने हाताचा रोजगार गेला आहे. सदर निर्णय मागे घ्यावा, निर्णय मागे न घेतल्यास टॅक्सी (काळी पिवळी)ला परिवहन महामंडळाचे नियम लागू करून शासनाने रक्कम अदा करावी किंवा टॅक्सी(काळी पिवळी),रिक्षाचालक यांच्यावर असलेले बँक कर्ज,गटाचे कर्ज माफ करावे व प्रतिमहा 20000 मानधन देण्यात यावे अन्यथा शासकीय सेवेत समाविष्ट करावे, देशाचे भवितव्य असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाकरिता मोफत प्रवास करण्याची सवलत देण्यात यावी. अशा मागण्या दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. राज्य सरकार काय निर्णय घेते याकडे वाहनधारकांचे लक्ष लागले आहे. आम्हा टॅक्सीचालक, रिक्षाचालकांवर आत्महत्या करण्याची वेळ राज्य सरकारच्या या निर्णयामुळे आली आहे.राष्ट्रपती,प्रधानमंत्री, केंद्रीय परिवहन मंत्री, रिक्षाचालक असलेले राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, सभापती, विरोधीपक्षनेते यांच्याकडे मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले आहे. मागण्या मान्य न झाल्यास वेळप्रसंगी राज्य सरकारच्या निर्णया विरोधात जनहित याचिका दाखल करण्यात येणार आहे.

# रेल्वे महामार्गामुळे मराठवाड्याच्या विकासाला चालना


## केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब दानवेंचा शाश्वत ग्राम विकासावर भर

आधुनिक केसरी

**केंद्रीय रेल्वेमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे यांनी रेल्वे मंत्रालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर मराठवाडा रेल्वे विकासाला अधिक बळ मिळाले आहे.रेल्वे प्रशासनाने कृतीयुक्त आराखडा तयार करून मराठवाड्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊले उचलली आहेत. रेल्वे प्रकल्पाला केंद्र सरकार गती देण्याचे कार्य करत आहे. भविष्यात ही योजना अधिक गतिमान झाल्यास त्यातून ग्राम विकासाला चालना मिळेल.यातूनच मराठवाड्याचे मागासलेपण दूर होण्यास मदत होईल.रेल्वे विकासाचे जाळे सर्वदूर पसरले तर मराठवाडा रेल्वे हब म्हणून ओळखला जाईल.असा केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचा मानस आहे.**

मराठवाड्याचे मागासलेपण दूर करायचे असेल तर नवीन सोर्स निर्माण करावे लागतील याची ना. दानवेंना जाणीव आहे. मराठवाड्यातील जनतेने केवळ शेतीवर अवलंबून न राहता शेती पूरक व्यवसाय निर्माण करून स्वालंबी बनणे हे भविष्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरेल.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दूरदृष्टी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब दानवे यांच्या संकल्पनेतून मराठवाड्यात रेल्वे जाळे निर्माण होण्याचा मार्ग सुकर झाला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शाश्वत विकास होण्यास मदत होणार आहे. मराठवाड्याच्या विकासास पूरक वातावरण तयार करावयाचे असेल तर रेल्वे लाईनला मराठवाड्यातील महत्त्वाचे शहर एकमेकांना जोडली गेली पाहिजे.छत्रपती संभाजीनगर हे आशिया खंडातील झपाट्याने वाढणारे शहर आहे. शहराला ऐतिहासिक व जागतिक वारसा लाभला आहे. येथील पंचतारांकित औद्योगिक वसाहत जगप्रसिद्ध आहे.तसेच जालना शहर सीड्स हब म्हणून जगप्रसिद्ध आहे.स्टील उत्पादन जालन्याचा आशिया खंडात दबदबा आहे.परभणी हे रेल्वे स्थानकाचे मुख्य ठिकाण असून कृषी क्रांतीचे शहर म्हणून ओळखले जाते.लातूर शहर शिक्षणाचे माहेरघर असून बीडमधील परळी वैजिनाथ हे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे.नांदेड हे शहर रेल्वेच्या माध्यमातून देशातील प्रमुख शहरांना जोडले गेले असून शीख बांधवांचे पवित्र असे धार्मिक ठिकाण आहे. छत्रपती संभाजीनगर,जालना, परभणी,नांदेड,लातूर,बीड, परळी,धाराशिव, हिंगोली ही शहरे रेल्वेच्या दृष्टीने एकमेकास जोडली गेली की यातून दळणवळणाच्या सोयी निर्माण होऊन व्यापार उद्योगास चालना मिळेल व विकासाला हातभार लागेल. अशा व्यापक उद्देशातून केंद्रीय रेल्वेमंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांनी रेल्वेचे नेटवर्कच्या सहाय्याने मराठवाड्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मराठवाड्यातील रेल्वे मार्गाचा विकास झाल्यास यामुळे स्थानिक व्यापारसह दळणवळण, कृषी, पर्यटन, उद्योग, औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून येईल.रोजगार निर्मितीच्या माध्यमातून मराठवाड्यातील ग्रामीण भाग विकासाच्या मुख्य प्रवाहास जोडला जाईल. यातूनच मराठवाड्याचे मागासलेपण दूर होण्यास मदत होईल.

**प्रा. बाळासाहेब बोराडे, जालना**



केंद्रीय राज्य रेल्वेमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रयत्नामुळे जालना-जळगाव रेल्वेमार्गास मंजुरी मिळाली त्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना प्रा. बाळासाहेब बोराडे.







शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार
किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in